महाराष्ट्र विधानसभा

चौथे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

पुणे शहरात मोठया प्रमाणात आगीच्या दुर्घटना घडल्याबाबत

(१) ३४४५५ (०२-०२-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात मागील सहा वर्षात आगीशी संबंधित १३ हजार घटना घडल्या असून त्यामध्ये माहे जानेवारी, २०२१ मध्ये १२२, माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये १८० तर माहे मार्च, २०२१ मध्ये २४४ अशा तीन महिन्यांमध्ये आग लागणाच्या ५४६ घटना घडल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगीच्या घटनांमध्ये जिवीतहानी कमी प्रमाणात झालेली असली तरी मालमत्ता मात्र भस्मसात होऊन वेळोवेळी कोटयावधी रुपयांचे नुकसान झाल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आग लागणाच्या घटनांप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आगीत जळून खाक झालेल्या मालमत्ते प्रकरणी संबंधितांना आर्थिक सहाय्य करण्याबाबत तसेच भविष्यात अशा प्रकारच्या आगीच्या दुघर्टना घडू नये तसेच दुघर्टना टाळण्यासाठी नागरिकांमध्ये प्रचार व प्रसार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०४-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) पुणे शहरामध्ये लागलेल्या सदरच्या आगी इलेक्ट्रिक शॉर्टसर्किट, कुकिंग गॅस लिकेज, पेटते दिवे, जळते सिगारेटचे थोटक फेकणे इत्यादी मानवी चुकांमुळे घडल्याचे दिसून आले असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

शहरातील आगीच्या दुर्घटना कमी करण्याच्या दृष्टीने पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकडून वेळोवेळी गृह निर्माण सोसायट्या, शाळा कॉलेजेस, मॉल्स, मल्टीप्लेक्सेस, रुग्णालये, झोपडपट्या, औद्योगिक वसाहती, शासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी आग प्रतिबंधक उपाययोजनेच्या दृष्टीने व्याख्याने, आग न लागण्यासाठी करावयाची कार्यवाही, लागलेली आग विझवणेकामी करावयाची उपाययोजना यांची प्रात्यक्षिके आयोजित करुन नागरिकांना माहिती दिली जाते व आगीपासून बचाव करण्याच्याा दृष्टीने मार्गदर्शन केले जाते. हे कार्य अग्निशमन सेवेकडून निरंतर सुरु असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवतन नाही.

कळंब (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील कळंबची जागा शासकीय रुग्णालयाचे विस्तारीकरण करण्यासाठी हस्तांतरित करणेबाबत

(२) ३४४९५ (१७-०१-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील ग्रामीण रुग्णालयाचे रुपांतर उपजिल्हा रुग्णालयामध्ये झालेले असल्याने त्याच्या विस्तारीकरणासाठी आवश्यक असलेली नगर परिषद, कळंबच्या मालकीची जागा ग्रामीण रुग्णालयास

हस्तांतरित करण्याबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक १३ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू नगरपरिषद कळंब यांनी त्यांच्या मालकीची जागा हस्तांतरण करण्याचा रितसर प्रस्ताव नगर रचनाकार अधिनियम, १९९६ मधील ३७ (१) अ. नुसार विशेष सभा घेऊन ठराव क्र.३९ द्वारे दिनांक २३ मार्च, २०१७ अन्वये मान्यता दिली होती, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, नगर परिषद कळंब यांनी सदरहू प्रस्ताव पुढील मान्यतेसाठी राज्य शासनाकडे जा.क्र. न.प.बा./२६९/२०१७-१८, दिनांक २९ एप्रिल, २०१७ रोजी पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रस्तावास अद्याप मान्यता न देण्याचे कारण काय,
(५) असल्यास, सदरहू प्रस्तावास विलंब लावणाऱ्या अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच प्रस्तावाला मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) कळंब नगर परिषदेकडून सदर प्रस्ताव दि.२९.०४.२०१७ रोजी सादर करण्यात आला असल्याचे अभिलेखात दिसुन येते. तथापि, सदर प्रस्तावाबाबतची वैधानिक कार्यवाही नगरपरिषद कळंब यांचेकडून पूर्ण झालेली नाही.
यास्तव, सदर फेरबदल प्रस्तावाबाबत वैधानिक कार्यवाही पूर्ण करून फेरबदल प्रस्ताव पुनश्च दि.०५.०८.२०२१ अन्वये नगरपरिषद कळंब यांनी विहीतमार्गे शासनास सादर केला असून संचालक (न.र.) यांचेकडून तांत्रिक छाननी अंती दि.२०.१२.२०२१ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे.
(४ व ५) सदर फेरबदल प्रस्तावाबाबत अतिरिक्त माहिती मुख्याधिकारी, कळंब यांचेकडे दि.१७.०२.२०२२ रोजीचे पत्र व दि.०९.०५.२०२२ च्या पत्रान्वये मागविण्यात आली असून सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर फेरबदल प्रस्तावाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील नगर रचनाकार यांच्याकडे जिल्ह्यातील विविध नगरपरिषदांची कामे प्रलंबित असल्याबाबत

(३) ३५०५२ (०२-०२-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील नगर रचनाकार यांच्याकडे जिल्ह्यातील विविध नगरपरिषदांच्या विकास कामांची नकाशे मंजुरी प्रकरणे व ना-हरकत प्रमाणपत्रे प्रलंबित असल्याने जिल्ह्यातील विकास कामे होत नसल्याची बाब दिनांक १५ मार्च, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जमीन कृषक, अकृषक करण्याची प्रकरणे देखील मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने नगर रचनाकार बुलढाणा यांच्याकडे प्रलंबित असलेली विविध विकास कामाचा नकाशा मंजुरी, ना-हरकत प्रमाणपत्र व जमीन कृषक तसेच अकृषकची प्रकरणे तातडीने मंजूर करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महापालिकेतील ११ समाविष्ट गावांत सुविधा निर्माण करण्याबाबत.

(४) ३५२२३ (०२-०२-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराच्या हद्दीलगतच्या ११ गावांना सन २०१७ मध्ये महानगरपालिकेत समाविष्ट केल्यानंतरही पाणीपुरवठा, घनकचऱ्याचे नियोजन तसेच प्रस्तावित रिंगरोड इत्यादी सुविधांपासून सदर गावे वंचित असल्याचे दिनांक १४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने येथील नागरीकांसाठी गावांचा विकास आराखडा तयार करुन व निधीची तरतूद करुन या गावांचा विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०७-११-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.

(२) पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट ११ गावांचे पाणीपुरवठा नियोजन करणे कामी DPR तयार करण्यासाठी तज्ञ सल्लागारची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर तज्ञ सल्लागार मार्फत प्राथमिक स्वरुपाचे काम पूर्ण झालेले असून सध्या अंतिम आराखडा बनविण्याचे काम चालू आहे. अंतिम आराखडा बनवून त्याची मान्यता प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रीतसर निविदा मागवून सदर भागात पाणीपुरवठा योजनेची कामे सुरु करण्यात येतील.

फुरसुंगी व उरुळी देवाची गावे पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ठ होण्याअगोदर पासून सदर गावात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत तुकाई दर्शन येथे ३३ एम एल डी जल शुद्धीकरण प्रकल्प व त्यानुषंगाने साठवण टाक्या व जलवाहिन्या विकसित करण्याचे काम चालू आहे.

समाविष्ट ११ गावातील निर्माण होणारा अंदाजे २५० ते २६० टन सर्व ओला व सुका कचरा संकलन करुन वाहतूक करुन पुणे महानगरपालिकेच्या कचरा प्रक्रिया प्रकल्पात प्रक्रिया केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जाती-जमाती आयोगाच्या नव्याने नियुक्तीस स्थापना करणेबाबत

(५) ३५८८७ (१२-०१-२०२२). श्री.बबनराव शिंदे (माढा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने व राज्य शासनाने अनुसूचित जाती-जमातीवरील अत्याचार दूर करण्याबाबत तसेच शैक्षणिक सामाजिक आर्थिक विकासाचे कार्यक्रम व योजना राबविणेकडे लक्ष देणे, अधिकारी-कर्मचारी यांच्यावर होणाऱ्या अन्याय प्रकरणात लक्ष घालून तो अन्याय दूर करणे यासाठी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाची स्थापना केली आहे हे खरे आहे काय.

(२) असल्यास, केंद्र शासन स्तरावर अनुसूचित जातीच्या प्रशानासाठी राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग आहे.अनुसूचित जमातींसाठी राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग आहे. परंतू महाराष्ट्रात मात्र अनुसूचित जाती-जमातीसाठी एकच आयोग आहे. हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जुलै, २०२० मध्ये राज्याचा अनुसूचित जाती-जमाती आयोग बरखास्त करण्यात आला असून दीड वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे तरी नव्याने आयोगाची नियुक्ती करणेत आलेली नाही हे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये निदर्शनास आलेले आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, समाजीतील प्रलंबित प्रश्नांचा निपटारा लवकर होईल, न्यायाच्या प्रतिक्षेत असलेल्यांना न्याय मिळणेसाठी, समाज हितासाठी चांगले काम करणेसाठी तसेच प्रभावीपणे काम करणेसाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात येत आहे अथवा करण्यात आली आहे काय.

(५) असल्यास, उक्त प्रकरणीअनुसूचित जाती-जमाती आयोगाची नव्याने स्थापना करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजन केली वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत.

श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५)

शासन निर्णय, दि.१० जुलै, २०२० अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अंतर्गत विविध कायदा/अधिनियमाव्दारे स्थापित केलेले आयोग/समित्यांवर नियुक्त केलेले अशासकीय अध्यक्ष/सदस्य यांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आलेल्या आहेत. तथापि, दि.२८ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगावर १ अध्यक्ष व २ सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबई येथील उपप्रादेशिक अधिकारी यांनी केलेल्या आत्महत्येबाबत

(६) ३६१५१ (१२-०१-२०२२). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र प्रदूषण महामंडळाचे नवी मुंबई येथील उपप्रादेशिक अधिकारी श्री.हेरंब प्रसाद गंदे यांनी माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान पुण्यामध्ये राहत्या घरी आत्महत्या केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.गंधे यांनी आत्महत्या करण्यापूर्वी सुसाईड नोट लिहून त्यामध्ये काही अधिकाऱ्यांची नावे लिहिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-११-२०२२) : (१) होय.
(२) होय.
(३) कोथरुड पोलीस स्टेशन, पुणे येथे सदर प्रकरणी अकस्मात मयत रजिस्टर नं. ८३/२०२१ सी.आर. पी.सी. कलम १७४ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. सदर प्रकरणी पोलीस पुढील तपास / कारवाई करीत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील एम (पूर्व) विभागातील बेकायदेशीर आणि नियमबाह्य नर्सिंग होम आणि रुग्णालयांवर कारवाई करणेबाबत

(७) ३६४४८ (०२-०२-२०२२). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील एम (पूर्व) विभागातील बेकायदेशीर आणि नियमबाह्य नर्सिंग होम आणि रुग्णालयांवर कारवाई करणेबाबत व संबधित अधिकारी यांचे निलंबन करण्याबाबत लोकप्रतिनिधी, मोर्शी यांनी दिनांक ३ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्या सुमारास नगरविकास मंत्री व आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांच्याकडे दिनांक १६ मार्च, २०२० रोजी वा त्या सुमारास तक्रार करून कारवाईची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई एम (पूर्व) भागातील व महाराष्ट्रातील बेकायदेशीर आणि नियमबाह्य नर्सिंग होम आणि रुग्णालयांवर कारवाई करण्यास प्रशासन टाळाटाळ करित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार बेकायदेशीर आणि नियमबाह्य नर्सिंग होम आणि रुग्णालयांवर कारवाई तसेच संबधित जबाबदार अधिकारी यांचे निलंबन व कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-११-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम/पूर्व विभागातील विनानोंदणी नर्सिंग होमवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मागील २ वर्षांत २४ निरीक्षण अहवाल देऊन त्यांचेविरोधात मा. न्यायालयात केसेस दाखल करण्यात आल्या आहेत.

मानखुर्द पोलीस ठाणे/ट्रॉम्बे पोलीस/देवनार पोलीस/शिवाजीनगर पोलीस ठाणे यांना त्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या अनधिकृत नर्सिंग होम/रुग्णालये यांच्यावर कायद्यान्वये कारवाई करण्याकरिता कळविण्यात आले आहे.

तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ४५ नर्सिंग होमची जलजोडणी खंडीत करण्यात आली असून, संबंधित नर्सिंग होम मालकांना बांधकामाची अधिकृतता सिध्द करण्याकरिता नोटीसेस देण्यात आल्या आहेत.

याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लोकप्रतिनिधींना दिनांक १२.०३.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आला आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ग्रा.पं. कान्द्री (ता. पारशिवनी, जि. नागपूर) ला नगरपंचायतमध्ये रूपांतर करण्याबाबतच्या प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

(८) ३८३७४ (१८-०४-२०२२). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रा.पं.कान्द्रीला (ता.पारशिवनी, जि.नागपूर) नगरपंचायतमध्ये रूपांतर करण्याकरिता महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३४१ क (१) नुसार जिल्हा परिषद, नागपूर मार्फत प्रस्ताव शासनाच्या मंजूरीकरिता सादर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्ताव सादर करून ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी होवूनही प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रा.पं. कान्द्री नगरपंचायतमध्ये रूपांतर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०४-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३)

• शासनाने नागपूर जिल्ह्यातील कांद्री (कन्हान) या ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रुपांतर करण्याबाबत दिनांक १९ ऑक्टोबर, २०२२ रोजी प्राथमिक उद्घोषणा निर्गमित केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या नवीन इलेक्ट्रिक बसेस खरेदी करण्याच्या प्रस्तावाबाबत

(९) ३८४१४ (२७-०४-२०२२). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२१ ते २०२५ पर्यंत सार्वजनिक वाहतुकीचे २५% विदयुतीकरण साध्य करण्याचे उद्दिष्ट केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिरा-भाईंदर महानगरपालिका परिवहन विभागाकडे उपलब्ध असलेल्या ७४ बसेस डीझेलवर चालविण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बसेसची संख्या शहरातील प्रवासी संख्या पाहता फारच अपुरी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मिरा भाईंदर महानगरपालिकेने नवीन इलेक्ट्रिक बसेस खरेदीसाठी राज्य शासनाकडे अनुदानासाठी पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (११-११-२०२२) : (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५)
• मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे उपलब्ध एकूण ७४ बसेस बसेस डिझेल इंधनावर चालविण्यात येत असून वाढत्या लोकसंख्येसाठी अधिक बसची आवश्यकता आहे.
• दि.२३.०७.२०२१ रोजी इलेक्ट्रिक वाहन धोरण निश्चित करण्यात आलेले असून २०२५ पर्यंत सार्वजनिक वाहतुकीची २५ टक्के वाहने बॅटरी इलेक्ट्रीक वाहन प्रकारातील करण्याचे उदिष्ट आहे.
• मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील हवा प्रदुषण कमी करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेस ई-बस खरेदी करणेसाठी अनुदान मिळणेकरीता पर्यावरण विभाग, प्रदुषण नियंत्रण मंडळ व पर्यावरण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे मागणी करण्यात आली होती.
• बृहन्मुबई महानगरपालिकेने १५ व्या वित्त आयोगाकडून प्राप्त होणारे ८०% अनुदान इ. व्ही. कॉम्पोनन्टसाठी खर्च करणेस पर्यावरण विभाग व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची मान्यता घेण्याचे सुचित केले.
• त्यासअनुसरून पर्यावरण विभाग व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांची मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव सादर केले असता, त्यांनी सुधारित Action Plan सादर करणेबाबत मिरा-भाईंदर महानगरपालिकेस कळविले आहे.
• मिरा-भाईंदर महानगरपालिकेने सादर केलेल्या City Action Plan मध्ये e-Bus चा समावेश करण्यात आले असल्याचे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास कळविण्यात आले आहे. १५ व्या वित्त आयोगाकडून e-Bus करीता अनुदान मिळणेसाठी तसेच शासनाचे निर्देशानुसार Wet-Lease पध्दतीने खरेदी करणेसाठी धोरणात्मक निर्णयाचा प्रस्ताव महासभेस सादर करण्यात आला असल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पूर्व भागात संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पावसाळी पाण्यामुळे शहरातील अनेक भागात पूरसदृश्य स्थिती निर्माण होत असल्याबाबत

(१०) ३८४३४ (२५-०४-२०२२). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पूर्व भागात संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पावसाळी पाण्यामुळे शहरातील अनेक भागात पूरसदृश्य स्थिती निर्माण होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाणी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पायथ्याशी अडवून साठविण्याचा प्रस्ताव मिरा-भाईंदर महानगरपालिकेने राज्य शासनाला दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुंबई जिल्ह्याचे पालकमंत्री तथा पर्यावरण मंत्री यांच्याकडे दिनांक १३ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (११-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४)
• संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वाहणाऱ्या पावसाच्या पाण्याची साठवणूक करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.१३.०१.२०२२ रोजी मा. मंत्री (पर्यावरण) यांचेकडे पत्रव्यवहार केला, ही वस्तुस्थिती आहे.

• मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पावसाळी पाणी उद्यानाच्या पायथ्याशी अडवून त्याचा वापर मिरा-भाईंदर शहरासाठी करण्याच्या दृष्टीकोनातून प्राथमिक अभ्यास महानगरपालिका स्तरावर करण्यात आलेला आहे.
• याबाबत अधिक मार्गदर्शन व प्रकल्पाची व्यवहार्यता तपासण्यासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दि.१६.०२.२०२२ रोजी अधिक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.
• याबाबत मार्गदर्शन प्राप्त झालेनंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येणार असल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली महापालिकेने जनतेच्या मालमत्ता करात अवास्तव वाढ केल्याबाबत

(११) ३८६३४ (१८-०४-२०२२). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण डोंबिवली महापालिकेने २७ गावातील जनतेच्या मालमत्ता करात तब्बल दहा पटीने अधिक केलेली अवास्तव करवाढ रद्द करण्यात यावी म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ यांनी मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, नगरविकास मंत्री आदीकडे सातत्याने मागणी केलेली असून सदरहू मागणीसाठी अनेक वेळा आंदोलनेही केली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू गावात आजही जिल्हा परिषदेच्या शाळा असून महापालिका शिक्षण उपकर, शासकीय शिक्षण उपकर (निवासी) याचप्रमाणे या गावांमधील मलप्रवाहाबाबत काहीही काम न करता मलप्रवाह कर आणि मलप्रवाह सुविधा लाभ कर अशा प्रत्यक्षपणे काहीही न केलेल्या कामासाठी वेगवेगळया नावाने कर आकारणी केली जात आहे या बरोबरीने पाणीपुरवठा लाभ कर, वृक्षसंवर्धन कर, पथकर अशा नावाखाली न दिलेल्या सुविधांची वसुली महापालिका करत असून, या आणि अशा अनेक समस्यांच्या निराकरणासाठी आणि शासनाचे लक्ष या अन्यायाकडे वेधण्यासाठी येथील भूमिपुत्रांसह जनतेने अनेक वेळा आंदोलनेही केलेली आहेत, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू मागणी बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (११-११-२०२२) : (१) अशा प्रकारची मागणी केली, हे खरे आहे.
(२) २७ गावातील २८ प्राथमिक शाळा, ७९ अंगणवाड्या, २ प्राथमिक आरोग्य केंद्र व १७ उपकेंद्र हे ठाणे जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखाली सुरू असून महापालिकेकडे अद्यापपर्यंत हस्तांतरीत झालेले नाहीत.
• २७ गावांतील मोठ्या नाल्यांची साफसफाई दरवर्षी केली जात असून लहान गटारांची साफसफाई नियमितपणे केली जात आहे. तसेच या गावातील शौचालये दुरूस्तीची कामे केली असून वसार, पिसवली, भाल, गोलीवली व आशेळे येथे नवीन शौचालये बांधणीचे काम केलेले आहे.
• केंद्र शासनाच्या अमृत योजने अंतर्गत २७ गावाकरीता रू.१९४.२० कोटीची कामे प्रगतीपथावर आहेत. त्यापैकी महानगरपालिकेचा ५०% हिस्सा आहे.
• २७ गावातील रस्त्यांची कामे नियमित करण्यात येत असून, चेतना हायस्कुल ते नेवाळी नाका विद्युतीकरणाकरीता रू.४१.७६ कोटी तसेच मलंग रोड ते उल्हानगर रस्त्याकरीता रू.२५.९६ कोटीची रस्ते बांधणीची कामे महानगरपालिका निधीतून करण्यात आलेली आहेत.
• २७ गावांकरीता अधिनियमातील तरतूदीनुसार कर आकारणी केलेली असून सोयी सुविधा न देता कराची वसुली केली, हे वस्तुस्थितीस धरून नाही.
(३) सन २००२ व त्यापुर्वी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीत असलेल्या व महानगरपालिकेकडून कर निर्धारण झालेल्या मिळकतीचे करयोग्य मुल्यात सुधारणा करून सर्वेक्षणाअंती क्षेत्रफळात दुरूस्ती असल्यास त्याप्रमाणात मालमत्ता कर कमी करण्यात आलेले आहे.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयानुसार ५२१ मिळकतींची मालमत्ता कराची देयके दुरूस्ती करून देण्यात आली असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील पलावा मेगा टाऊनशिप मधील मालमत्तांना दुहेरी कर भरावा लागत असल्याबाबत

(१२) ३८६३६ (२५-०४-२०२२). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकारनिर्मित स्मार्ट सिटी प्रकल्पापैकी डोंबिवलीतील (जि.ठाणे) पलावा शहर असून, सदरहू प्रकल्पाअंतर्गत पाणी, वीज पुरवठा, मलनि:स्सारण, घनकचरा व्यवस्थापन, कार्यक्षम नागरी वाहतूक, आयटी कनेक्टिव्हिटी, ई-प्रशासन यांनी स्वयंपूर्ण असलेला राज्यातील महत्त्वाचा प्रकल्प आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पलावा शहराकडून पलावा वसाहत व्यवस्थापन आणि कल्याण-डोंबिवली महापालिकेकडे कर भरण्यात येत असल्याने अशा प्रकारे दुहेरी करामुळे पलावा शहर आर्थिक संकटात सापडले असल्यामुळे पलावा मेगा टाऊनशिपमधील मालमत्तांना दुहेरी कर लागत असल्याने पुनर्मूल्यांकन करून दुहेरी करातून मुक्तता करावी अशा आशयाची मागणी मागील एक वर्षापासून सातत्याने स्थानिक नागरिकांनी तसेच लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, नगर विकास मंत्री तसेच कर निर्धारण व संकलन, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने पलावा मेगा टाऊनशीप मधील मालमत्तांना दुहेरी कर लागत असल्यामुळे त्यांचे विनाविलंब पुनर्मुल्यांकन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (११-११-२०२२) : (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) पलावा वसाहत व्यवस्थापनाकरीता विकासकाने नियुक्त केलेल्या संस्थेमार्फत आकारण्यात येणारी रक्कम ही User Charges स्वरूपाची असून महानगरपालिकेने आकारलेली रक्कम ही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार कर स्वरूपाची असल्याने पलावा शहरातील सदनिकाधारकांना दुहेरी कर भरावा लागत असल्याची बाब वस्तुस्थितीस धरून नाही.
• मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मेगासिटी प्रकल्पाअंतर्गत दिलेल्या मंजूऱ्या, अधिनियमातील तरतूद व अधिसूचनानुसार करात सवलत देण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरू असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी जिल्ह्यातील रमाई घरकुल योजनेअंतर्गत मंजुर लाभार्थ्यांना रेती उपलब्ध करून देण्याबाबत.

(१३) ३९४६७ (०९-०४-२०२२). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील रमाई घरकुल योजनेअंतर्गत मंजुर असलेल्या लाभार्थ्यांच्या घरकुलांची कामे रेतीच्या कमतरतेमुळे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाद्वारे सदरील लाभार्थ्यांना रेती देण्याचा शासन निर्णय निर्गमित झाला असतानाही परभणी जिल्ह्यातील लाभार्थ्यांना याचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रेती नसल्यामुळे घरकुलांची कामे प्रलंबित असल्याने अनेक कुटुंब घरकुलापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रमाई घरकुल योजनेअंतर्गत मंजूर लाभार्थ्यांना रेती उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी

(गंगाखेड) यांनी दिनांक ३१ मे,२०२१ रोजी सामाजिक न्याय मंत्री व जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त मागणीनुसार रेती उपलब्ध करून घरकुलापासून वंचित असणाऱ्या लाभार्थ्यांना लवकरात लवकर घर मिळुण देण्याबाबत शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०२२) : (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) रमाई आवास योजना अंतर्गत दरवर्षी प्राप्त होणाऱ्या उद्दीष्टांनुसार घरकुलापासून वंचित असणाऱ्या लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करून त्यास टप्पेनिहाय बांधकामासाठी मागणीप्रमाणे व आवश्यकतेनुसार रेती उपलब्ध करून देण्याबाबत सर्व जिल्हा व तालुक्यांना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष यांचेमार्फत सूचना देण्यात आल्या आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईमध्ये रस्ते अपघात होण्याचे प्रमाण वाढत असल्याबाबत

(१४) ४०३०७ (३०-०३-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये दररोज रस्ते अपघात होण्याचे प्रमाण जास्त आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा अपघातात जीव गमावणाऱ्यांची संख्या जास्त आहे हे ही खरे आहे का,
(३) असल्यास, वाहनांची वाढती संख्या आणि अरुंद व दुरवस्था झालेले रस्ते यामुळे रस्ते अपघातांचे प्रमाण वाढत आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, यावर शासनाच्या वतीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (०१-११-२०२२) :(१) मुंबई वाहतूक विभागाच्या अहवालानुसार सन २०२० मध्ये १८१२ व सन २०२१ मध्ये २२३० अपघातांची नोंद आहे.
(२) मुंबई वाहतुक विभागाच्या अहवालानुसार सन २०२० मध्ये ३४९ व सन २०२१ मध्ये ३८७ मयत झाल्याची नोंद आहे.
(३) मुंबईमध्ये अरुंद व दुरावस्था झालेल्या रस्त्यांमुळे अपघात झाल्याची तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये अद्याप प्राप्त झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हदीतील श्रीमलंग रोड ने चिंचपाडा रोड येथे रस्त्याच्या मध्यभागी असलेली माधव अपार्टमेंट बाधित होत असल्याबाबत

(१५) ४०८७० (२०-०४-२०२२). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील श्रीमलंग रोड ते चिंचपाडा या १०० फुटी रोडला जोडणाऱ्या चिंचपाडा रोड येथे रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या माधव अपार्टमेंट ही अधिकृत इमारत बाधित होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील नियोजित असलेले मुख्य मार्ग व मुख्य प्रकल्पामध्ये बाधित असलेल्या घरांचे पुनर्वसन होत नसल्यामुळे संबधित प्रकल्प पूर्णत्वास नेता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबधित सर्व प्रकल्प पुर्णत्वास नेण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (११-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) माधव अपार्टमेंट मौजे काटेमानेवली येथील इमारतीस सन १९९३ मध्ये बांधकाम परवानगी दिली असून सन १९९५ मध्ये बांधकाम पूर्णत्वाचा दाखला दिलेला आहे. सदर इमारत महानगरपालिकेच्या विकास योजना मंजूरीपूर्वीची आहे.
• सदर इमारतीमधील एकूण १३ सदनिका/गाळे धारकांना पुनर्वसनासाठी पात्र ठरविण्यात आले आहे.
• महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतूद व शासन धोरण यानुसार सद्यस्थितीमध्ये विविध विकास योजना आरक्षणे व रस्त्याखालील क्षेत्र महापालिकेने ताब्यात घेतलेले असून बहुतांशी ठिकाणी आरक्षणे व रस्ते विकसित झालेले आहेत.
• महानगरपालिकेच्या पुनर्वसन धोरणानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अनेक इमारतींवर अनधिकृत उभारण्यात आलेले मोबाईल टॉवर संदर्भात

(१६) ४०९२४ (२५-०४-२०२२). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील अनेक इमारतींवर अनधिकृत मोबाईल टॉवर उभारण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अवैध मोबाईल टॉवरची तक्रार स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधीमार्फत नवी मुंबई महानगरपालिकेकडे करण्यात आली, हे ही खरे आहे काय ?
(३) असल्यास, सदर प्रकरणी कारवाई करण्यास पालिकेकडून दुर्लक्ष केले जात आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, या टॉवरमधून येणाऱ्या रेडिएशनमुळे विविध आजार होण्याचा धोका असतानाही बेकायदा मोबाईल टॉवरबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (११-११-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) मोबाईल टॉवर उभारणे संदर्भात मा.उच्च न्यायालयात रिट याचिका (स्टॅम्प) क्र. २०४३/२०१४ अन्वये टॉवर्स ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रोव्हायडर असोसिएशन व इतर यांनी महाराष्ट्र शासन व इतर यांचेविरूध्द दाखल केली होती.
• त्यास अनुसरून मा. उच्च न्यायालयाने सर्व महानगरपालिका व त्याचे कार्यक्षेत्रात असलेल्या मोबाईल टॉवरबाबत Coercive steps घेण्यात येऊ नये, असे दि.१२.०९.२०१४ अन्वये आदेश निर्गमित केले आहेत.
• सदर आदेशान्वये महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत मोबाईल टॉवर हटविणे व सिल करणेपासून परावृत्त केले असल्याने अनधिकृत टॉवर संदर्भात कारवाई करता येत नसल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

ग्रामपंचायत नाचणठाव (ता. अकोले, जि. अहमदनगर) येथील जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत झालेल्या पाझर तलाव दुरुस्तीच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराबाबत.

(१७) ४१०२२ (११-०४-२०२२). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत नाचणठाव (ता. अकोले, जि. अहमदनगर) जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागामार्फत करण्यात आलेल्या पाझर तलावाच्या दुरुस्तीच्या कामात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याबाबत वारंवार लेखी व तोंडी तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामाची श्री गणेश कन्स्ट्रक्शन अरोटे यांना निविदा देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामाचा दोषमुक्त दायी व (Defect liabilities) कालावधी दोन वर्षांचा असुनसुद्धा ग्रामपंचायतीने केलेल्या तक्रारीवरून जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभाग, अहमदनगर यांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी उपसरपंच व इतर ग्रामस्थ नाचनठाव, ता.अकोले,जि.अहमदनगर यांनी जलयुक्त शिवार अभियान सन २०१८-१९ अंतर्गत पाझर तलाव दुरुस्ती नाचणठाव ता. अकोले कामांमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याबाबत दि.२०/०४/२०२१ रोजी लेखी तक्रार केलेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) कंत्राटदारास दोषमुक्त दायीत्व (Defect liabilities) कालावधीमध्ये दोष निवारण काम करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

सदर कामाची उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जि.प.ल.पा. उपविभाग कोपरगाव यांनी चौकशी केलेली असून त्यानुसार तक्रारदार उपसरपंच, ग्रामपंचायत नाचणठाव ता. अकोले यांना दि.२३/०८/२०२१ नुसार कळविलेले आहे. तसेच, जिल्हा जलसंधारण अधिकारी, अहमदनगर यांनी दि.३०/०६/२०२२ रोजी पाहणी केली असता, सदर तलावामध्ये २० टक्के पाणीसाठा झालेला होता व तलावाच्या तळातून व मूळ भरावातून गळती होत नसल्याचे दिसून आले. तदनंतर ऑगस्ट,२०२२ मध्ये उपविभागाने तक्रारदारासमवेत तलावाची पाहणी केली असता, सदर तलाव ९० टक्के भरलेला होता. तसेच ड्रेन कार्यान्वीत झालेले होते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील कायमस्वरूपी नियुक्ती झालेल्या मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांचे वेतन थकीत असल्याबाबत.

(१८) ४१५८३ (२५-०४-२०२२). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेत सन २०१७ कायमस्वरूपी नियुक्ती झालेल्या सफाई कामगारांना अद्याप त्यांचे वेतन मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेली अनेक वर्षे कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या सफाई कामगारांना कायमस्वरूपी नियुक्ती देण्यासंदर्भातील आदेश औद्योगिक लवादाने सन २००७ मध्ये दिला असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामगारांचे पूर्वलक्षी प्रभावाने थकीत वेतन न दिल्यामुळे प्रत्येक कामगारांची ५ लाख ७५ हजार इतके वेतन थकीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सध्या महानगरपालिकेचे २७०० सफाई कामगार थकीत वेतन मिळण्यासाठी पात्र असून त्यापैकी ६७ जणाचे निधन झाले असून त्यांच्या वारसांना पालिकेकडून नोकरी तसेच मृत कामगारांच्या पत्नींना निवृत्ती वेतनही मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मुंबई महानगरपालिकेतील कायमस्वरूपी नियुक्ती झालेल्या सफाई कामगारांचे थकीत वेतन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०४-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील २७०० कंत्राटी कामगारांना कायमस्वरुपी नियुक्ती देण्याबाबत सन २००७ मध्ये मा. औद्योगिक न्यायालयात दाखल केलेल्या दावा क्र. आयटी १३/२००७ मध्ये मा. औद्योगिक न्यायालयाने दिनांक १३.१०.२०१४ रोजी सदर २७०० कंत्राटी कामगारांना बृहन्मुंबई महानगरपालिकेत कायम करण्याचे आदेश दिले.

मा. औद्योगिक न्यायालयाच्या सदर आदेशाविरुध्द बृहन्मुंबई महानगरपालिकेने मा. उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका मा. उच्च न्यायालयाने मान्य न केल्यामुळे महानगरपालिकेने मा. सर्वोच्च न्यायालयात एसएलपी ६२०२/२०१७ दाखल केली. सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर कामगारांना उचित आर्थिक सहाय्य देण्याबाबत आदेश दिले आहेत.

सदर २७०० कंत्राटी कामगारांची तपासणी करण्याकरिता मा. औद्योगिक न्यायालयाने अन्वेषण अधिकाऱ्यांची नेमणूक केली होती. सदर तपासणीस २७०० पैकी १६०० कंत्राटी कामगार उपस्थित होते व अन्वेषण अधिकाऱ्याने तपासणी केल्यानुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याकरिता सन २०१८ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तपासणी शिबिर घेण्यात आले.

सदर तपासणी शिबिरामध्ये १६०० कंत्राटी कामगारांपैकी २७ मृत व ३८ सेवानिवृत्त कामगारांचे देय निकाली काढण्याची कार्यवाही प्राधान्याने तात्काळ करण्यात येत आहे. मृत कामगारांच्या पत्नीला नियमानुसार निवृत्ती वेतन देय असल्यास निवृत्तीवेतन देण्यात येते. तसेच सदर कर्मचाऱ्यांच्या वारसाला अनुकंपा तत्व (पी.टी. केस) अनुज्ञेय असल्यास त्यांना अनुकंपा तत्वावर महानगरपालिकेमध्ये नोकरी देण्यात येईल.

उर्वरित १५३५ कामगारांपैकी १३७६ कामगारांना थकीत वेतनापोटी प्रत्येकी रु. १ लाख इतकी रक्कम पूर्वीच देण्यात आली आहे. तद्नंतर सदर कामगारांची वेतननिश्चिती करुन त्यांना लेखा पडताळणी सापेक्ष उर्वरित थकबाकीचे अधिदान करण्यात आले आहे.

तथापि उर्वरित ९६ कामगारांच्या नावात तफावत असल्याने व ६३ कामगार ओळख परेड कॅम्पला हजर नसल्याने त्यांच्या अधिदानाची मंजुरी दुसऱ्या टप्प्यात घेण्यात आली असून थकबाकीचे अधिदान करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, ११३ कामगारांनी सादर केलेली कागदपत्रे परिपूर्ण नसल्याने त्यांचे देय दावे प्रलंबित आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

ठाणे जिल्ह्यातील कल्याण पूर्व शहरातील आरक्षित जागेवर एक मोठे सुसज्य रुग्णालय बांधण्याबाबत

(१९) ४२०५० (२५-०४-२०२२). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण पूर्व शहरात एक मोठे सुसज्य असे रुग्णालय अस्तित्वात नसतांना कल्याण पूर्वेतील १०० फुटी रोड लगत रुग्णालयाकरिता आरक्षण क्र. २८३ वर ३०,००० चौ.मी. जागा आरक्षित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू जागा आरक्षित असतांना महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या केवळ २६६०.७८ चौ.मी.जागा जागेवर तळमजला + पहिला मजला असे २२६.८९ चौ.मी. क्षेत्राचे बांधकामाकरिता राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशनसाठी आरोग्य केंद्र बांधण्यास परवानगी दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कल्याण पूर्व भागात सुसज्य असे रुग्णालय उभारण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांची गेल्या अनेक वर्षापासुनची मागणी असतांना महानगरपालिकेने आरक्षित भुखंड अधिग्रहण न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (११-११-२०२२) : (१) व (२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील सेक्टर ४ च्या मंजूर विकास योजनेमध्ये आरक्षण क्र. २८३ “इस्पितळ” या वापराकरीता आरक्षित आहे.
• सदर आरक्षणाचे २६६०.७८ चौ.मी. क्षेत्र हस्तांतरणीय विकास हक्काच्या माध्यमातून महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले आहे.
• या आरक्षणावर राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य मिशनसाठी आरोग्य केंद्र बांधणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५८ अन्वये परवानगी देण्यात आली ही, वस्तुस्थिती आहे.
(३) व (४) आरक्षण क्र. २८३ “इस्पितळ” या आरक्षणाचर उर्वरित जागा हस्तांतरणीय विकास हक्काच्या मोबदल्यात महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेकरीता संबंधित जमिन मालकांना नोटीस देण्यात आलेल्या आहेत.
• सदर आरक्षणाची जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरू असून आरक्षणाची जागा ताब्यात आलेनंतर आरक्षण विकसित करण्यात येणार असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा ही संतांची भूमी असून येथे संत चोखामेळा यांचे स्मारक बांधण्याबाबत

(२०) ४२७२३ (१८-०४-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा ही संतांची भूमी असून येथे संत चोखामेळा यांचे स्मारक करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे?
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (०४-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) मंगळवेढा नगरपरिषद हद्दीत श्री संत चोखामेळा यांचे समाधी मंदिर आहे.
• श्री संत चोखामेळा यांचे स्मारक बांधण्यासाठी संत चोखामेळा समाधी ट्रस्ट, मंगळवेढा यांचेकडून जागेची मागणी केली आहे.
• त्यानुसार जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी स्थळ पाहणी केली असून जिल्हाधिकारी यांच्याकडून स्थाननिश्चिती व स्मारकाचे स्वरुप इत्यादी ठरविण्याचे काम सुरु आहे, असे जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी शासनास कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर महानगरपालिकेने पालिका स्तरावर ‘पे अँड पार्क’ राबविण्याबाबत चा प्रस्ताव रद्द करण्याबाबत

(२१) ४२७५९ (२७-०४-२०२२). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर महानगरपालिकेच्यावतीने वाहतूक समस्यांचे निवारण करण्यासाठी ‘पे अँड पार्क’ राबविण्याबाबतचा प्रस्ताव महासभेमध्ये सादर करण्यांत आला असल्याने, सदर प्रस्तावाला नगरसेवकांनी विरोध केला असून प्रस्ताव रद्द करावा अशी मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, 'पे अँड पार्क' च्या प्रस्तावाला लोकप्रतिनिधी, शहरातील सर्व व्यापारी संघटना व व्यापारी एन.जी.ओ. यांनी मोठ्या प्रमाणावर विरोध केला असून हा प्रस्ताव रद्द न केल्यास दुकाने बंद करून रस्त्यावर उतरण्याचा इशारा व्यापाऱ्यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच विषय कर ६ बाबतची माहिती नगरसेवकांना अवगत करणे आवश्यक असतानाही या ऑनलाईन सभेमध्ये नगरसेवकांना बोलू न दिल्यामुळे नगरसेवकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास सदर 'पे अँड पार्क' चा प्रस्ताव नगरसेवकाना विचारात न घेता व घाईने घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रस्ताव रद्द करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२२) : (१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २४३अ नुसार उल्हासनगर महानगरपालिकेस पार्किंग धोरण ठरविण्याचा अधिकार आहे. त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनाने वाहतूक समस्या निवारणासाठी धोरणात्मक बाब म्हणून सर्वसाधारण सभेत पे ॲण्ड पार्क धोरण ठराव क्रमांक ४७ अन्वये मंजूर केले होते.

तथापि, उल्हासनगर शहरातून व्यापारी व राजकीय प्रतिनिधींचा विरोध झाल्याने अशासकीय ठराव क्र. ६८ अन्वये सदर प्रशासकीय ठराव रद्द करण्यात आला, असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही. उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनाने सविस्तर गोषवारा सादर केला होता, त्याआधारे पे ॲण्ड पार्क धोरण मंजूर करण्यात आले होते, असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) हे खरे नाही.
(५) पे ॲण्ड पार्किंगचा सदर ठराव रद्द झाल्याने अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

पालघर जिल्ह्यालगत नवे शहर विकसीत करण्याच्या प्रकल्पाबाबत

(२२) ४३०३१ (२७-०४-२०२२). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हा मुख्यालय संकुलाची उभारणी करणाऱ्या सिडकोकडून उर्वरीत ३७७ हेक्टर क्षेत्रात पालघर लगत नवे शहर विकसीत करण्याची प्रक्रिया सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील नवनगर या नव्याने उभारल्या जाणाऱ्या शहर प्रकल्पाकरीता प्रभावी विकास धोरण आखण्यासाठी औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञांबरोबर सिडकोचा विचार विनिमय सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गुंतवणुकदार व इच्छुक खरेदीदारांकडून सिडकोने सुचनाही मागविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त नव्या शहराच्या निर्मितीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

पालघर जिल्ह्याचे मुख्यालय तसेच पालघर नवनगर विकसित करण्यासाठी एकूण ४४०-५७ हेक्टर शासकीय जमीन सिडकोकडे वर्ग करण्यात आली आहे. यापैकी १०३-५७ हेक्टर शासकीय जमीन विविध विभागांच्या जिल्हास्तरीय कार्यालयासाठी जिल्हा मुख्यालयांच्या विकासासाठी वापरण्यात येणार असून उर्वरित ३३७ हेक्टर शासकीय जमीन पालघर नवनगर म्हणून विकसित करण्यात येणार आहे.
(२) (३) व (४) सिडकोने पालघर नवघर नियोजन प्रस्ताव बनविण्यासाठी व विकासासाठी काही नवीन कल्पना यासारख्या महत्वाच्या प्रमाणानुसार माहितीचा अंदाज घेणे नियोजनदृष्ट्या समजुन घेण्यासाठी अभिव्यक्ती स्वारस्य

(Expression of Interest) प्रकाशित करण्यात आले आहेत. सदर अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) बाबतींचा विचार लक्षात घेवून तसेच आजूबाजूलगतच्या विकास कार्य व प्रकल्प विकसीत होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतूदीनुसार प्रारुप नियोजन प्रस्ताव (Proposal) सिडकोने संचालक, नगर रचना, पुणे यांना सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर महानगरपालिकेत रिक्त पदे असल्याबाबत

(२३) ४३१५४ (२५-०४-२०२२). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर महानगरपालिकेत अनेक पदे रिक्त असल्यामुळे प्रभारी अधिकारी यांचा बोलबाला असल्याची घटना माहे डिसेंबर मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उल्हासनगर महानगरपालिकेत प्रतिनियुक्ती वर अधिकारी येत नसल्याने लिपिक दर्ज्याच्या कर्मचाऱ्यांकडे वर्ग १ आणि वर्ग २ च्या अधिकारी पदाचा पदभार सोपविले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उल्हासनगर महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीने अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यास शासन मागे-पुढे करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यामुळे उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये शहर अभियंता, कार्यकारी अभियंता, सहाय्यक आयुक्त ,विधी अधिकारी ,मालमत्ता व्यवस्थापक मुख्य स्वछता निरीक्षक ,वाहन व्यवस्थापक अतिक्रमण विभागप्रमुख, सहाय्यक नगररचनाकार आधी महत्वाची पदे रिक्त असल्याने नागरिकांची कामे प्रलंबित राहत असल्याचे निदर्शनास आल्ये आहे हे खरे आहे काय,
(५) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता यांना इतर विभागाचा कार्यभार दिल्याने या बांधकाम विभागाचे काम असेच चालू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. एकनाथ शिंदे (०४-११-२०२२) : (१) उल्हासनगर महानगरपालिकेत एकूण १६ पदांवर प्रभारी कार्यभार सोपविण्यात आलेले आहेत.
(२) उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर वर्ग-१ व वर्ग-२ च्या विविध संवर्गातील पदे नामनिर्देशाने/पदोन्नती /प्रतिनियुक्तीने भरली जातात.
तसेच, शासनामार्फत मंजूर आस्थापना सूचीनुसार वर्ग-१ व वर्ग-२ ची पदेच प्रतिनियुक्तीने भरली जातात.
(३) उल्हासनगर महानगरपालिकेत अतिरिक्त आयुक्त-२, उपायुक्त-३, तसेच, मुख्य लेखा अधिकारी, लेखा अधिकारी, मुख्य लेखा परीक्षक, अंतर्गत लेखा परीक्षक, सहा. मुख्य लेखापरीक्षक, सहायक आयुक्त, कार्यकारी अभियंता, उपअभियंता, नगररचनाकार व सहायक नगररचना या पदांवर प्रत्येकी १ असे वर्ग-१ व वर्ग-२ च्या विविध पदांवर प्रतिनियुक्तीने अधिकारी कार्यरत आहेत.
तसेच, बहुतांश पदे उल्हासनगर महानगरपालिमधील कर्मचारी यांच्यातून पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.
(४) उल्हासनगर महानगरपालिकेत शासनामार्फत प्रतिनियुक्तीने नियुक्त कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग) कार्यरत असून, त्यांच्याकडे शहर अभियंता या पदाचा कार्यभार सोपविण्यात आला आहे.
सहायक नगररचनाकार या पदावर शासनाकडून प्रतिनियुक्तीने अधिकारी कार्यरत आहे.
सद्य:स्थितीत सहायक आयुक्त, विधी अधिकारी, मालमत्ता व्यवस्थापक, मुख्य स्वच्छता निरीक्षक, वाहन व्यवस्थापक, अतिक्रमण विभागप्रमुख आवश्यकतेनुसार प्रभारी कार्यभार सोपविण्यात आला आहे. तसेच, नागरिकांची कामे वेळोवेळी होत आहेत.

(५) हे खरे नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

अंबाजोगाई, जि. बीड. येथील नगरपरिषदेमधील शौचालय व नळ जोडणी योजनेतर्गंत करण्यात आलेला गैरव्यवहार

(२४) ४३२७१ (२७-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील नगरपरिषदेअंतर्गत दलित वस्ती पाणीपुरवठा व स्वच्छता योजनेअंतर्गत सन २०१०-११ मध्ये शौचालय व नळ जोडणी लाभ देण्यात आले असून, यामध्ये तत्कालीन नगरसेवक यांनी मोठा गैरव्यवहार केल्याप्रकरणी तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने तत्कालीन मुख्याधिकारी यांनी चौकशी समिती गठीत केली असून, सदर समितीच्या अंतिम अहवालातील अनेक मुद्दावर तक्रारदारांनी आक्षेप नोंदविला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजना फक्त मागासवर्गीयासाठी असतांना इतर समाजातील लोकांना देखील लाभ देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन नियमाप्रमाणे लोकवाटा देणे लाभार्थ्यास बंधनकारक असतांना फक्त २०८ लोकांनी लोकवाटा भरला असून, नळजोडणी पूर्ण झाल्याचे दाखवून ५५८ नळजोडणीचे देयक अदा करून शासनाची आर्थिक फसवणूक करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी लाभार्थ्यांच्या नावावर लाभ उचलण्यात आला मात्र प्रत्यक्षात त्यांना लाभ देण्यात आला नाही असे शपथपत्र बऱ्याच लाभार्थ्यांनी जिल्हाधिकारी यांना दिले आहे हे खरे आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर गैरव्यवहाराची तत्कालीन जिल्हाधिकारी श्री, रेखावर यांच्या समोर नव्याने दिनांक २९ डिसेंबर, २०२० रोजी सुनावणी सुरु करण्यात आली असून, सर्व दोषींना नोटीसा बजावण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास सदर प्रकरणी तातडीने चौकशी करून दोषीवर कठोर कार्यवाही करण्याबाबत मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री व जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे दिनांक १५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(८) असल्यास, उक्त गैरव्यवहाराप्रकरणी शासनाने तत्कालीन नगराध्यक्ष, मुख्याधिकारी, चौकशी समितीचे सदस्य, यांच्यावर कोणत्या प्रकारची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-११-२०२२) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सुनावणीबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, बीड यांच्या स्तरावर सुरु आहे.

(५) व (६) हे खरे आहे.

(७) हे खरे आहे.

(८) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सुनावणीबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, बीड यांच्या स्तरावर सुरु आहे.

नवी मुंबईतील भांडर्ली व आसपासच्या १४ गावे नवी मुंबई महानगरपालिकेत समाविष्ट करण्याबाबत

(२५) ४३४१६ (२५-०४-२०२२). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महापालिकेची १ जानेवारी, १९९२ रोजी स्थापना झाली असून त्यावेळी भांडर्ली व आसपासच्या १४ गावे वगळण्याबाबतची मागणी सदरहू गावातील ग्रामस्थांनी केल्यामुळे त्या वेळेपासून सदरहू गावे वगळण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गावे पुन्हा नवी मुंबई महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात यावी अशी मागणी सदरहू गावातील ग्रामस्थांनी मागील काही वर्षांपासून सातत्याने शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू १४ गावांतील ग्रामस्थांसमवेत विविध बाबी संदर्भात बैठक झाली असता, पुन्हा सदरहू ग्रामस्थांनी ही १४ गावे नवी मुंबई महानगरपालिकामध्ये समाविष्ट करण्याची मागणी मा. नगर विकास मंत्री तथा पालकमंत्री, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत दिनांक १२ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने भांडर्ली व आसपासच्या १४ गावे नवी मुंबई महानगरपालिकेत समाविष्ट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (११-११-२०२२) : (१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत ०१.०१.१९९२ पासून समाविष्ट असलेली भांडार्लीसह १४ गावे दि.०८.०६.२००७ च्या अधिसूचनेन्वये वगळण्यात आली, हे खरे आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) सन २०२२ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात उपस्थित लक्षवेधी सूचनेला उत्तर देतांना ठाणे जिल्ह्यातील दि.०८.०६.२००७ च्या अधिसूचनेद्वारे वगळलेल्या १४ गावांचा नवी मुंबई महानगरपालिकेत पुन्हा समावेश करण्याचे घोषित केले आहे.
• त्यास अनुसरून विभागीय आयुक्त कोकण विभाग व आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचेकडील प्राप्त अहवालानुसार, ठाणे जिल्ह्यातील १४ गावांचा दि.१२.०९.२०२२ च्या अधिसूचनेन्वये नवी मुंबई महानगरपालिकेत समावेश करण्याबाबतची प्राथमिक उद्घोषणा निर्गमित करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील बोरिवली येथील नॅन्सी एस.टी.डेपो येथे बसपोर्ट उभारण्याबाबत

(२६) ४३६२० (०९-०४-२०२२). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वीर सावरकर नगर, बोरिवली (पूर्व) येथील नॅन्सी बस आगारात बसपोर्ट उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार प्रशासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली, त्याचे स्वरुप काय आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-११-२०२२) : (१) होय.
(२) व (३) राज्यातील बसस्थानकांच्या आधुनिकीकरण मोहिमेअंतर्गत बोरीवली नॅन्सीकॉलनी येथे आधुनिक सुविधायुक्त बसतळ उभारणेकरीता सन २०१७ मध्ये निविदा मागविण्यात आल्या, सदर निविदेस ३ वेळा मुदतवाढ देण्यात आली. मात्र, विकासकांचा प्रतिसाद प्राप्त झाला नाही.

पुणे महानगरपालिकेतील समाविष्ट झालेल्या गावांमध्ये कचरा प्रश्न सोडविण्याबाबत

(२७) ४३८०६ (३१-०३-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेतील समाविष्ट झालेल्या गावांमध्ये कचऱ्याचा प्रश्न निर्माण झाला असून तो सोडविण्यासाठी प्रशासनाने कचऱ्याची वाहतूक, प्रकल्प उभारणीचा अंदाज तयार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यानुसार आवश्यक मनुष्यबळ व वाहनांच्या खर्चासाठी वर्षाला सुमारे ४० कोटी रुपये खर्च होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच नवे प्रकल्प उभारणीसाठी ६० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त कचरा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०७-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
मनुष्यबळ व वाहनांच्या खर्चासाठी वर्षाला रु. ३० कोटी पर्यंत खर्च होणार आहे.
(३) अंशत: खरे आहे. नवे प्रकल्प उभारण्यासाठी रु.३५.६ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.
(४) कचरा प्रक्रिया तात्काळ होण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या अस्तित्वातील काही प्रकल्पांमध्ये प्रक्रिया क्षमता वृद्धी करण्याची कार्यवाही पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण (जि.ठाणे) पश्चिमेकडील केडीएमसीच्या पाच आयुक्तांसह सहाय्यक नगररचनाकार, विकासक आणि वास्तूविशारद यांच्यावर गुन्हा दाखल करण्याबाबत.

(२८) ४४४८३ (२४-०५-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि.ठाणे) पश्चिमेकडील केडीएमसी मुख्यालयाच्या जवळ असलेल्या माणिक कॉलनी वसाहतीच्या पुनर्विकासात अनियमितता आणि फसवणूक झाल्याच्या तक्रारीनुसार बाजारपेठ पोलीस ठाण्यात केडीएमसीच्या पाच आयुक्तांसह सहाय्यक नगररचनाकार, विकासक आणि वास्तूविशारद अशा १८ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कलम ४२०, ४१८, ४१५, ४६०, ४४८, १२० ब, ३४ आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ९ आणि १३ नुसार गुन्हे दाखल केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशीअंती केडीएमसीच्या सर्व दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तसेच विकासक व वास्तुविशारदावर शासनाने कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (११-११-२०२२) : (१) व (२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका मुख्यालयाजवळ असलेल्या माणिक कॉलनी वसाहतीच्या पुनर्विकासात करारनाम्याची पुर्तता होत नसल्याने श्री. अरूण गांधी यांनी बाजारपेठ पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीवर कार्यवाही होत नसल्याचे नमूद करून त्यांनी मे. कल्याण न्यायालय येथे दावा दाखल केला.
• त्यास अनुसरून मे. कल्याण न्यायालय यांनी दावा क्र.३२७/२०२१ मधील दि.१८.०१.२०२२ रोजीच्या आदेशामध्ये पोलीस निरीक्षक, बाजारपेठ पोलीस स्टेशन यांना भारतीय दंड संहितेच्या कलम १५६(३) अन्वये चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.
• त्यानुसार बाजारपेठ पोलीस स्टेशन येथे भा.द.वि. च्या कलम ४२०, ४१८, ४१५, ४६७, ४४८, १२०ब, ३४ व भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ९ आणि १३ नुसार महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी, विकासक व वास्तुविशारद यांचेविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
• याच दाव्याचे अनुषंगाने मे. कल्याण अतिरिक्त सत्र न्यायालय यांचेकडे दाखल करण्यात आलेल्या रिव्हीजन ॲप्लीकेशन मध्ये दि.२१.०५.२०२२ च्या आदेशान्वये मे. कल्याण न्यायालयाचेदि.१८.०१.२०२२ चे आदेश Set aside केले तसेच सदर दावा ही रद्द केला, ही वस्तुस्थिती आहे.
(३) माणिक कॉलनी या रहिवाशी संकुलाला महानगरपालिकेच्या तत्कालीन मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार ७० टक्के भाडेकरूंचे संमतीपत्र घेऊन प्रोत्साहनपर चटई क्षेत्रासह बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

• मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदर भूखंडावरील इमारतीमध्ये पुर्वीच्या भाडेकरूंचे पुनर्वसन करणेकरीता विकासक व महानगरपालिका यांचेकडून वेळोवेळी कार्यवाही करण्यात आलेली आहे.
• माणिक कॉलनी वसाहतीच्या पुनर्विकासात कोणतीही अनियमितता व फसवणूक झाली नसल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

समुद्राचे खारे पाणी गोड करण्याच्या प्रकल्पाचा खर्च मुंबई महानगरपालिकेला आर्थिक दृष्ट्या परवडणारा नसल्याबाबत

(२९) ४४५६३ (२०-०९-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) समुद्राचे खारे पाणी गोड करण्याच्या प्रकल्पाचा खर्च ३ हजार ६०० कोटी रुपये असून तो मुंबई महानगरपालिकेला आर्थिक दृष्ट्या परवडणारा नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्पाचा अभ्यास करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्प अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२२) : (१), (२) व (३) नि:क्षारीकरण प्रकल्पासंदर्भात महाराष्ट्र इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट एनेबलिन्ग ऑथॉरिटी अधिनियम २०१८ अन्वये स्वीस चॅलेंज तत्वानुसार मे. आयडीईने मसुदा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) नुकताच सादर केला असून, प्राप्त अहवालानुसार सदर प्रकल्पाचा अंदाजित भांडवली खर्च सुमारे २०६६ कोटी व २० वर्षांचा परिचलन व देखभाल खर्च सुमारे १३४० कोटी इतका अंदाजित आहे.
सदर सविस्तर प्रकल्प अहवाल, निविदा दस्तऐवजाचे मूल्यार्पण करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असून, सदर काम प्रगतीपथावर आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महापालिकेकडून प्रतीवर्षी पावसाळयातील पाणी उपशासाठी करण्यात येणाऱ्या कोटयवधी रुपयांच्या अवाजवी खर्चांबाबत

(३०) ४४७०६ (२०-०९-२०२२). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेकडून यावर्षी पावसाळयात सखल भागात अतिवृष्टीच्या काळात साचणाऱ्या पाण्याचा निचरा होण्यासाठी ३८० उपसा करणारे पंप बसविण्यात येणार असल्याची माहिती माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाणी उपसासाठी मुंबई महापालिका तब्बल ९२ कोटी रुपये खर्च करणार असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रत्येक वर्षी महानगरपालिकेकडून पंप भाडे तत्वावर घेऊन ते लावले जातात, महापालिका पाणी उपसण्याचे पंप खरेदी करत नाही, दरवर्षी कोटयवधी रुपये खर्च करुन सदर पंप भाडे तत्वावरच घेऊन वापरले जात असून, पावसाळयानंतर ते कंत्राटदारांना परत दिले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर महानगरपालिकेच्या धोरणामध्ये बदल करुन मुंबईत पावसाळयामध्ये साचणाऱ्या पाण्याचा निचरा करण्यासाठी एक स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यासाठी शासनाने कोणती ठोस कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-११-२०२२) : (१) व (२) पावसाळ्यात बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सखल भागात अतिवृष्टीच्या काळात साचणाऱ्या पाण्याचा निचरा होण्यासाठी दिनांक २५.०५.२०२२ ते दिनांक १५.१०.२०२२ व दिनांक २५.०५.२०२३ ते दिनांक १५.१०.२०२३ या कालावधीकरिता बृहन्मुंबई महानगरपालिका ३८० नग पाणी उपसा करणारे पंप भाडेतत्वावर घेत आहे.

सदर पंपासाठीचा दोन वर्षांसाठीचा एकूण खर्च रु. ८९.१२ कोटी इतका असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिका प्रत्येक वर्षी ३८० नग पाणी उपसा करणारे पंप खालील कारणास्तव भाड्याने घेत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे:-

• पावसाळ्यात लावल्या जाणाऱ्या पंपांची क्षमता पूरग्रस्त ठिकाणाच्या परिस्थितीनुसार बदलत असते. त्यामुळे विविध क्षमतेचे पंप दरवर्षी भाड्याने घेतले जातात.

• सदर पंपांचा उपयोग फक्त पावसाळ्यात चार महिन्यांसाठी होत असतो. त्यामुळे सदर पंप खरेदी करणे संयुक्तीक ठरत नाही.

• सदर ३८० नग पंपांकरिता प्रथम, द्वितीय व तृतीय पाळी मिळून जवळपास २५०० कर्मचाऱ्यांची पंपांच्या प्रचलनासाठी व परिररक्षणासाठी आवश्यकता आहे. इतके मनुष्यबळ महानगरपालिकेकडे उपलब्ध नाही. सदर कर्मचाऱ्यांची आवश्यकता केवळ चार महिन्यांसाठी भासते.

• पंप न वापरता पडून राहिल्यास खराब होण्याची शक्यता असते.

• पंप विकत घेतल्यानंतर त्यांचे परिरक्षण करण्याची गरज भासेल.

• ३८० नग पंप ठेवण्यासाठी तसेच विजेवर चालणाऱ्या सबमर्सिबल पंपांसाठी डिझेल जनरेटर ठेवण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील २४ रुग्णांलयामध्ये अग्निसुरक्षेबाबत त्रुटी असल्याबाबत

(३१) ४४७६९ (२०-०९-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील २४ रुग्णांलयामध्ये अग्निसुरक्षेबाबत त्रुटी असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील १३२४ रुग्णांलयापैकी ६६३ रुग्णांलयांना नोटीस देवून त्रुटी दूर करण्यात सांगितले असता, यापैकी ६३९ रुग्णांलयांनी त्रुटी दूर करून अग्निशमन दलाला अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित २४ रुग्णांलयाना नोटीसा देऊनही अग्निसुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती २४ रुग्णांलयाच्या व्यवस्थापनांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) मुंबईतील एकूण १५७४ रुग्णालयांपैकी ६८७ रुग्णालयांमध्ये तपासणीदरम्यान अग्निसुरक्षेविषयक त्रुटी आढळून आल्यामुळे सदर रुग्णालयांना महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. त्यापैकी २४ रुग्णालयांनी अग्निसुरक्षाविषयक अटी व शर्तींची पूर्तता विहित वेळेत केलेली नसल्याने त्यांच्यावर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम ३६ नुसार शिक्षा व दंडात्मक कारवाईची प्रक्रिया सुरु आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) मुंबईतील रुग्णालयांनी अग्निसुरक्षेबाबत ना-हरकत प्रमाणपत्र मिळविण्यासाठी रुग्णालयाचे आग/ऑक्सीजन/स्ट्रक्चरल/इलेक्ट्रीकल ऑडीट करण्याबाबत, अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी निधी मंजूर करण्याबाबतची तरतूद ही संबंधित रुग्णालयांचे मालक/भोगवटादार यांचेमार्फत करण्यात येते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेची चार प्रमुख रुग्णालये, एक दंत महाविद्यालय, १६ उपनगरीय रुग्णालये तसेच, ५ विशेष रुग्णालये आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. रुग्णालयाचे अग्निविषयक ऑडिट करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. उर्वरित रुग्णालयांचे अग्निविषयक ऑडिट करण्यात आले असून, प्राप्त ऑडिटनुसार अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी के.ई.एम. रुग्णालय रु. २.५ कोटी, सायन रुग्णालय रु. ४३ लाख, कुपर रुग्णालय रु. १.९५ कोटी, उपनगरीय रुग्णालयांसाठी रु. १ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

सदर तरतुदीमधून आवश्यक अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी तसेच तांत्रिक निविदा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच कार्यकारी आरोग्य अधिकारी यांचे अखत्यारीतील प्रसुतीगृहे व रुग्णालयांमध्ये अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध नसून, यंत्रे व संयंत्रे या लेखा संकेतांकामधून भागविण्यात येईल. प्रसुतीगृहाकरिता अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विशेष मोहिमेंतर्गत वेळोवेळी आढावा घेण्यात येतो व रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील प्रलंबित विकास कामे तातडीने सुरु करण्याबाबत.

(३२) ४५२१० (२५-०९-२०२२). कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेची निवडणूक नियोजित वेळेत न झाल्याने ८ मार्चपासून मुंबई महानगरपालिकेत प्रशासकाची नियुक्ती झाल्यानंतर निविदा मागवण्याचे प्रमाण ८० ते ९० टक्क्यांनी घटल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बाब मुंबईत होणारे लहान, मोठ्या विकासकामांना बसत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासकाद्वारे मुंबईतील मंजुर कामांची निविदा न मागविण्यात येण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, मुंबईतील मंजुर विकासकामे तातडीने सुरु करण्यासाठी सदरील निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२२) : (१), (२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुक न झाल्यामुळे प्रभाग समिती निधी व प्रभागनिहाय नगरसेवक निधी विकासकामांकरिता प्राप्त झालेला नाही.

त्याव्यतिरिक्त सन २०२२-२३ च्या आर्थिक तरतुदीनुसार विकासकामांच्या निविदा प्रक्रिया नियमितप्रमाणे राबविण्यात येत आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील विविध भूमिगत वाहिन्या व उपयोगिता सेवांसाठी बांधल्या जाणाऱ्या वाहिन्यांबाबत

(३३) ४५३०२ (२३-०९-२०२२). श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रस्ते कामांची सुमारे २ हजार कोटींचे प्रस्ताव माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मंजूर झालेले असतानाही रस्त्याच्या बाजूने विविध भूमिगत वाहिन्या व उपयोगिता सेवांसाठी बांधल्या जाणाऱ्या वाहिन्यांबाबत सल्लागाराचे काम पूर्ण न झाल्याने रस्तेबांधणी अजूनही सुरु होऊ शकली नसल्याची बाब दिनांक ४ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्तेबांधणी करण्याआधी भूमिगत जलवाहिन्या, मलनिस्सारण वाहिन्या, गॅस यासह विविध प्रकारच्या उपयोगिता सेवांसाठी सातत्याने खोदकाम करावे लागू नये याकरिता स्वतंत्र वाहिन्या टाकण्याचा निर्णय घेण्यात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-११-२०२२) : (१) मुंबईतील रस्त्यांच्या कामांसाठी माहे डिसेंबर, २०२१ मध्ये मंजूर झालेल्या प्रस्तावांपैकी शहर विभागात रु. ६५२.९८ कोटी, पश्चिम उपनगरात रु. १०५७.८५ कोटी व पूर्व उपनगरात रु. ५६८.८२ कोटी इतक्या रकमेचे प्रस्ताव मंजूर झाले आहेत.

सदर रस्त्याच्या रुंदीसापेक्ष उपयोगिता सेवांसाठी भूमिगत वाहिन्यांची तरतूद करण्यात आली असून, सर्व कामांचे कार्यादेश माहे जानेवारी, २०२२ व मार्च, २०२२ मध्ये देण्यात आले आहेत. त्यानुसार सदर कामांसाठी वाहतूक पोलिसांचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेली कामे प्रगतीपथावर आहेत.

सदर कामांचा कालावधी पावसाळा वगळून असल्यामुळे माहे जून, २०२२ ते सप्टेंबर, २०२२ या कालावधीकरिता सदर कामे बंद ठेवण्यात आली होती. तथापि उर्वरित सर्व ररस्त्यांची पर्जन्य जलवाहिन्यांसह बांधणीची कामे वाहतूक पोलिसांचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त होताच पुन्हा सुरु करण्यात येणार आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

भूमिगत नलिका या लवचिक उपयोग वाहिन्यांसाठी आहेत. त्यामुळे भूमिगत जलवाहिन्या, मलनि:सारण व गॅस वाहिन्या भूमिगत नलिकेतून टाकता येणे संयुक्तिक नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई स्थित देवनार डम्पिंग ग्राउंड सभोवती संरक्षित भिंत बांधण्यासाठी येणाऱ्या खर्चात वाढ केल्याबाबत

(३४) ४५३४२ (२५-०९-२०२२). श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई स्थित देवनार डम्पिंग ग्राउंड सभोवती संरक्षित भिंत बांधण्यात येत असून या कामाचा खर्च ३२ कोटी रुपयांवरून ४४ कोटी रुपयांवर पोहचला असल्याची बाब दिनांक ६ एप्रिल, २०२२ वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदाराला विनानिविदा अकरा कोटी रुपयांचे अतिरिक्त काम मिळाले असून पालिकेने अंदाजित केलेल्या खर्चापेक्षा कमी खर्चात काम करण्याची तयारी दर्शवून कंत्राटदाराने काम मिळविले परंतु ९० टक्के काम झाल्यानंतर कामाचा खर्च वाढल्याचे सांगून कंत्राटदाराने आपला कोट्यावधी रुपयाचा फायदा करून घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२२) : (१) हे खरे आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) हे खरे नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

डहाणू (जि.पालघर) येथील के.टी.नगर जवळच्या स्मशानभूमीची झालेली दयनिय अवस्था

(३५) ४५३५४ (२३-०९-२०२२). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि.पालघर) येथील के.टी.नगर जवळच्या स्मशानभूमीची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी दोन वर्षांपूर्वीच डहाणू नगरपरिषदेला निवेदन देण्यात आले असून, याकडे पालिकेने दुर्लक्ष केल्याची बाब दिनांक ६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन तक्रारीची दखल न घेणाऱ्या नगर परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कारवाई करुन स्मशानभूमीचे नुतनीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) डहाणू नगरपरिषद हद्दीतील मल्याण के.टी.नगर येथील स्मशानभूमीतील शवदाहीनी, पायरी दुरुस्ती करणे, प्लास्टर करुन रंगकाम करणे इ. कामे करणे आवश्यक होते. त्यामुळे नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेने ठरावाव्दारे मंजूरी दिल्यानुसार दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेत महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत

(३६) ४५३६४ (२५-०९-२०२२). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेसह २४ विभाग कार्यालयांमध्ये तब्बल १ लाख २ हजार कर्मचारी कार्यरत असून यामध्ये महिला कर्मचाऱ्यांची संख्या मोठया प्रमाणावर असून महिला छेडछाडीचे प्रकार वाढत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे जानेवारी ते डिसेंबर, २०२१ या वर्षांत तब्बल ३३ तक्रारी महिला कर्मचाऱ्यांची छेडछाड केल्याच्या असून मुंबई महानगरपालिकेत महिला कर्मचारी असुरक्षित असल्याची माहिती माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच महिलांच्या सुरक्षेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२२) : (१) व (२) माहे जानेवारी ते डिसेंबर, २०२१ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेत महिला कर्मचाऱ्यांची छेडछाड केल्याच्या ३३ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थानिक अंतर्गत तक्रार समित्यांमार्फत चौकशी करण्यात आली आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील महिलांच्या लैंगिक छळाच्या तक्रारींची दखल घेऊन कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) कायदा २०१३ प्रमाणे खालीलप्रमाणे कारवाई करण्यात येते:-

• स्थानिक अंतर्गत तक्रार समित्यांकडून त्याचे निवारण करण्यात येते.
• कायद्याप्रमाणे आणि मनपा सेवा नियमावलीप्रमाणे शिक्षेची शिफारस करण्यात येते.
• प्रत्येक वर्षी त्याचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात येतो.
• शासनाच्या, महिलांचे हक्क व कल्याण समितीची भेट व बैठकीत सदर अहवाल सादर करुन त्यावर चर्चा होते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेत महिला कर्मचाऱ्यांची छेडछाड केल्याच्या ३३ तक्रारींपैकी २५ प्रकरणांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली/येत आहे:-

• २० प्रकरणी दोषसिध्दी झाली असून, ५ प्रकरणी दोषसिध्दी झालेली नाही.
• दोषसिध्दी झालेल्या २० प्रकरणांपैकी ८ प्रकरणी लेखी ताकीद देण्यात आली आहे.
• ५ प्रकरणी वेतनवाढ/वेतनवाढी (कायमस्वरुपी / हंगामी स्वरुपात) रोखण्याच्या शिक्षेची शिफारस करण्यात आली आहे.
• १ प्रकरणी शिक्षेची शिफारस करण्यात आली आहे.
• ३ प्रकरणी बदलीची शिफारस करण्यात आली आहे.
• १ प्रकरणी माफीनामा देण्यात आला आहे.
• १ प्रकरणी सहा महिन्यांकरिता निलंबित करण्यात आले आहे.
• १ प्रकरणी कामावरुन काढून टाकण्याची शिफारस करण्यात आली आहे.

उर्वरित ८ प्रलंबित प्रकरणांपैकी ४ प्रकरणी चौकशीची कार्यवाही सुरु असून, कोविड कालावधीमुळे संबंधित तक्रारदार, आरोपित तसेच, साक्षीदार त्यावेळी उपस्थित होऊ न शकल्याने चौकशीसाठी विलंब झाला आहे. तसेच, ४ प्रकरणी आरोपित कर्मचारी पॉक्सो कायद्यांतर्गत अटकेत असल्याने चौकशीची कार्यवाही प्रलंबित आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

भायखळा (मुंबई) येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान आणि प्राणिसंग्रहालयातील प्राणी अधिवास उभारण्याच्या निविदा रद्द केल्याबाबत

(३७) ४५३६६ (२५-०९-२०२२). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भायखळा (मुंबई) येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान आणि प्रणिसंग्रहालयात उभारण्यात येणाऱ्या रुपये २९१ कोटी रुपयांच्या प्राणी अधिवास निविदा रद्द करण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी १०६ कोटी रुपयांच्या निविदेत गैरव्यवहार आणि अनियमितता असल्याचा संशय लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) मुंबई यांनी केला असल्याने, महानगरपालिकेस योग्य ती चौकशी करण्याचे पत्र दिल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी रद्द केलेल्या निविदांची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशी अहवालाच्या अनुषंगाने गैरव्यवहार व अनियमितता करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२२) : (१) सदर निविदा रद्द करण्यात आल्या आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

((२) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेविरुध्द आर्थिक गुन्हे विभाग यांना दिनांक ३०.१२.२०२१ रोजी सादर

केलेली तक्रार दिनांक ११.०१.२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे वर्ग करण्यात आली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करुन अवगत करण्याची विनंती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस केली होती, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
३) सदर निविदा मागविताना सर्व प्रक्रिया योग्य पध्दतीने पाळल्या असल्याने व बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने निविदा रद्द केलेली असल्याने, प्रस्तुत निविदांमध्ये कोणतीही अनियमितता व भ्रष्टाचार झालेला नाही. त्यामुळे सदर प्रकरणी चौकशी करण्याची आवश्यकता नाही व याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांना दिनांक २० मे, २०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

जलसंधारण विभागाचे स्वतंत्र जिल्हास्तरीय कार्यालय परभणी येथे स्थापन करण्याबाबत

(३८) ४५५६९ (०९-१०-२०२२). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलसंधारण विभागाचे स्वतंत्र जिल्हास्तरीय कार्यालय परभणी येथे स्थापन करण्याची मागणी स्थाानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, जलसंधारण मंत्री यांच्याकडे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जायकवाडी, लोअर दुधना आणि येलदरी धरणासह अन्य जलसंधारण प्रकल्प जिल्ह्यात असतांनाही जलसंधारणा संबंधित परभणी जिल्हयाचे कार्यालय जालना येथे असल्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने परभणी येथे जलसंधारण विभागाचे स्वतंत्र जिल्हास्तरीय कार्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मृद व जलसंधारण विभागाच्या दि.२६.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यस्तर यंत्रणेमध्ये परभणी येथे जिल्हा जलसंधारण अधिकारी कार्यालय नव्याने कार्यान्वित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील धारावी येथील प्रेमनगर विभागाच्या जवळ मिठी नदीवर अपघातांचे प्रमाण वाढत असल्याबाबत

(३९) ४५५९७ (२७-०९-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील धारावी येथील प्रेमनगर विभागाच्या जवळ मिठी नदीवर असणारी संरक्षक भिंत सद्य:स्थितीत अस्तित्वात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भिंत नसल्याने याठिकाणी अपघातांचे प्रमाण वाढत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पावसाळ्यात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाल्यास स्थानिक नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२२) :(१), (२), (३) व (४) मिठी नदीचा सी.एस.टी. पूल ते माहिम कॉजवे दरम्यानच्या भागातील नदीलगत संरक्षक भिंत बांधण्याचे काम एमएमआरडीए प्राधिकरणामार्फत करण्यात आले आहे.

तथापि, आता सदर भागातील मिठी नदी विकास व प्रदुषण नियंत्रण अंतर्गत प्रस्तावित कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पॅकेज-३ अंतर्गत करण्यात येणार आहेत. सदर पॅकेज-३ मध्ये मिठी नदीच्या लगत सीएसटी पूल ते माहिम कॉजवे दरम्यान उर्वरित संरक्षक भिंत बांधण्याचे काम देखील अंतर्भूत आहे.

सद्य:स्थितीत पॅकेज-३ च्या कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर असून, प्रेमनगर येथील मिठी नदीलगत संरक्षक भिंत बांधण्याचे काम देखील सदर निविदेमध्ये समाविष्ट आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सेव्हन हिल रूग्णालय (ता.अंधेरी, जि.मुंबई उपनगर) येथे कर्करोग रूग्णांच्या उपचारार्थ १०० खाटा आरक्षित करून स्वतंत्र कक्ष कार्यान्वित करण्याबाबत

(४०) ४५६२१ (२७-०९-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्करोग रूग्णालयासाठी आरक्षित असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या मरोळ (ता.अंधेरी पूर्व, जि.मुंबई उपनगर) येथील भूखंडावर सेव्हन हिल रूग्णालय उभारण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत या रूग्णालयात कर्करोगग्रस्त रूग्णांवर उपचार सुरू नसल्याने मुंबई शहरातील टाटा मेमोरियल रूग्णालयात रूग्णांना नाईलाजास्तव जावे लागले असून त्यामुळे रूग्णांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून टाटा मेमोरियल रूग्णालयावरही अतिरिक्त रूग्णांचा भार वाढत असल्याची बाब माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सेव्हन हिल रूग्णालयात कर्करोगग्रस्त रूग्णांच्या उपचारार्थ १०० खाटा आरक्षित करण्याची तसेच कर्करोगग्रस्तांच्या उपचारार्थ स्वतंत्र कक्ष निर्माण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे माहे मार्च, २०२२ मध्ये मा.मुख्यमंत्री, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने सेव्हन हिल रूग्णालयात कर्करोगग्रस्त रूग्णांकरिता १०० खाटा राखीव ठेवण्याबाबत तसेच त्याकरिता स्वतंत्र कक्ष कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२२) : (१) अंधेरी मरोळ येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भूखंडावर सार्वजनिक-खाजगी सहभाग प्रोत्साहन प्रकल्पांतर्गत मे. सेव्हन हिल्स हेल्थकेअर प्रा.लि. यांचेमार्फत मल्टिस्पेशालिटी रुग्णालय चालविण्याचा प्रकल्प राबविण्यात आला होता. यामध्ये कॅन्सरवरील रेडिएशन थेरपी उपचारांची व्यवस्था कार्यान्वित करण्यात आली होती, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) सद्य:स्थितीत इन्सॉल्व्हन्सी व बँक करप्टसी कोड २०१६ अंतर्गत सेव्हन हिल्स रुग्णालयाचे प्रचालन करणाऱ्या मे. सेव्हन हिल्स हेल्थकेअर प्रा.लि. या कंपनीच्या दिवाळखोरी संबंधातील दावा नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल, अमरावती यांच्याकडे प्रलंबित आहे.

कोरोना विषाणूच्या प्रसारास प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या कार्यवाही अंतर्गत कोरोना बाधीत रुग्णांचे अलगीकरण व प्रासंगिक उपचार तसेच कोविड लसीकरणासाठी मरोळ येथील रुग्णालयाचे प्रचालन करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मे. सेव्हन हिल्स हेल्थकेअर प्रा.लि. यांना निधीचा पुरवठा करण्यात येत आहे.

तसेच, स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केल्यानुसार, एसएचपीएल यांचेविरुध्द एन.सी.एल.टी. अमरावती येथे सुरु असलेल्या कॉर्पोरेट इन्सॉल्व्हन्सी रिझोल्युशन प्रोसेसच्या निकालासापेक्ष, मरोळ येथील सेव्हन हिल्स रुग्णालयात बंद असलेल्या कॅन्सर उपचार व्यवस्थेच्या तज्ज्ञांकडून आढावा घेण्यात आला असून, या रुग्णालयात कॅन्सर उपचार व्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी प्रशासकीय मंजुरीबाबत प्रक्रिया कार्यान्वित करण्यात आली आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

जोगेश्वरी ,मुंबई येथील बृहनमुंबई महानगरपालिकेच्या रागीनवार (प्रेमनगर मार्केट) मंडईचा विकास करणेबाबत

(४१) ४५६४३ (२७-०९-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (मुंबई उपनगर) येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रागीनवार (प्रेमनगर) भाजी व मासळी मंडईच्या देखभालीकडे प्रशासनाचे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने या ठिकाणी गेल्या कित्येक वर्षांपासून व्यवसाय करणारे मासळी व भाजी विक्रेते यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मंडईमध्ये जवळपास ७९ मार्केट पीच व ८३ लहान दुकाने असून येथील विक्रेत्यांना विशेषत: मासळी विक्रेत्यांना पाणी, वीजे यासारख्या मुलभूत सुविधा प्रशासनाकडून पुरविण्यात येत नसल्याने मंडईमध्ये घाणीचे साम्राज्य पसरत असून त्यामुळे येथे खरेदीकरिता येणाऱ्या नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मंडईतील पायवाटा या दुरुस्तीअभावी खड्डेमय झालेल्या असल्याने पावसाळयात या मंडईत मोठया प्रमाणात चिखल निर्माण होत असून या परिसरात उंदीर तसेच अन्य सरपटणारे प्राणी यांचा प्रादुर्भाव वाढत असून मंडईच्या शेडची मोठया प्रमाणात पडझड झाली असल्याने भविष्यात अपघात होवून नागरिकांच्या व विक्रेत्यांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू मंडईच्या दुरूस्तीबाबत प्रशासनाकडे तक्रार केली असता केवळ तात्पुरती दुरूस्तीपोटी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कोटयवधी रुपयांच्या निधीचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू मंडईचे एकूण क्षेत्रफळ लक्षात घेता सदरहू बैठया मंडईचा पुनर्विकास करून या ठिकाणी बहुमजली बहुउद्देशीय इमारत बांधल्यास नागरिकांकरिता एक सुरक्षित मंडई तसेच प्रशासनाच्या कारभाराकरिता अतिरिक्त जागा उपलब्ध होवू शकणार असल्याने, त्यानुसार सदरहू मंडईचा पुनर्विकास करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना दिनांक ३१ जानेवारी, २०२२ व दिनांक ९ फेब्रुवारी, २०२१ रोजी लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने उक्त प्रकरणी शासनाने रागीनवार (प्रेमनगर मार्केट) मंडईचा विकास करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-११-२०२२) : (१) जोगेश्वरी (पूर्व) येथील रागीनवार मंडई (प्रेमनगर मार्केट) महानगरपालिकेच्या जुन्या मंडईचे संरचनात्मक सल्लागाराकडून परिक्षण करण्यात आले असता, सदर मंडई C२A (इमारत आंशिकरित्या रिक्त करुन मोठ्या प्रमाणावर दुरुस्ती करणे) श्रेणीमध्ये घोषित झाली आहे.

तथापि, सदर मंडईची दुरुस्ती करण्यासाठीचा खर्च नवीन बांधकामासाठी येणाऱ्या खर्चाच्या ४५% पेक्षा जास्त असल्याने मोठ्या प्रमाणावर दुरुस्तीऐवजी सदर मंडईच्या जागी नवीन मंडई बांधण्याचे ठरविले आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) सदर मंडईमध्ये अनुज्ञापत्रधारकांना वीज व पाण्याची सुविधा असून, मंडईची साफसफाई वेळेवर करण्यात येते. तसेच, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरिता योग्यरित्या साफसफाई केली जाते, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) सदर मंडईमध्ये पावसाळ्यामध्ये चिखल निर्माण झाल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभाग कार्यालयामार्फत साफसफाई करण्यात येते. तसेच, शेडची तात्पुरती दुरुस्ती हाती घेण्यात आली आहे.

सदर मंडईच्या संरचनात्मक अहवालानुसार सुचविण्यात आलेला खबरदारीचा उपाय म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागामार्फत प्रोपिंग, बॅरिकेडींग लावण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आली आहे. तसेच, सदर मंडईमध्ये आवश्यक ती किरकोळ डागडुजीची कामे करण्यात येतात, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदर मंडईच्या तात्पुरत्या दुरुस्तीवर मोठ्या प्रमाणात खर्च आवश्यक नाही. तथापि, सदर मंडईच्या पुनर्विकासासाठी आराखडा नामंजुरीची सूचना (I.O.D.) प्राप्त होऊन जुनी शेड निष्कासित करेपर्यंत अत्यावश्यक दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने तशी तात्पुरती दुरुस्ती करण्याचे काम हाती घेतले आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) सदर मंडईचा पुनर्विकास करण्याबाबत दिनांक ३१.०१.२०२२ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने त्यांना सद्य:स्थिती व सदर मंडई विकसित करण्यात येणार असल्याबाबत अवगत केले आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(६) सदर मंडईचा अद्ययावत सर्व सोयींयुक्त पुनर्विकास/ नुतनीकरण करण्याचे प्रस्तावित असून, रागीनवार मंडईचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. सदर मंडईच्या उपलब्ध संरचनेनुसार सद्य:स्थितीतील आराखडा तयार करण्यात आला आहे.

न.भू.क्र. १३९ व १४१ (भाग) मौजे मजास भूखंडाचा ऑनलाईन नगर भूमापन अभिलेख पडताळला असता, सदर भूखंडाच्या मालमत्ता पत्रकावर बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नाव नसल्याने, मालमत्ता पत्रकावर महानगरपालिकेचे नाव चढविण्यासाठी नगर भूमापन अधिकारी, अंधेरी, विकास नियोजन विभाग व मालमत्ता विभाग यांच्याशी पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच, महानगरपालिका वास्तुशास्त्रज्ञ/सल्लागार यांचेकडून सदर मंडईच्या पुनर्विकासाचे आराखडे महानगरपालिकेच्या बाजार विभागाच्या समन्वयाने तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

जलयुक्त शिवार अभियांनातर्गत यवतमाळ जिल्हयात कृषि अधिकारी आणि ठेकेदारांनी कामांमध्ये केलेला अपहाराबाबत

(४२) ४५६६८ (०९-१०-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत यवतमाळ जिल्हयात कृषि अधिकारी आणि ठेकेदारांनी संगनमताने ६९७ कामांमध्ये सुमारे १५ कोटी रुपये जास्तीचे दाखवून अहवाल शासनास माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले तसेच सदर अहवालानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत यवतमाळ जिल्हयात कृषि अधिकारी आणि ठेकेदारांनी संगनमताने ६९७ कामांमध्ये सुमारे १५ कोटी रुपये जास्तीचे दाखवून कामांमध्ये अपहार केल्याचे आढळून आलेले नाही.
त्यामुळे कोणत्याही चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

चतुर्थश्रेणी कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या वारसदारास नोकरीत सामावून घेण्याबाबत

(४३) ४५६९७ (२५-०९-२०२२). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांचे वारसदार मुलास किंवा अविवाहीत मुलीस विशेष बाब म्हणून शासकीय सेवेत अनुकंपा तत्वावर समाविष्ट करुन घेण्याच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१४ एप्रिल, १९८१ व दि.१० डिसेंबर, १९८१ रोजीच्या शासन परित्रकास दिलेली स्थगिती मा.उच्च न्यायालयाने दि.२५ सप्टेंबर,२०१८ रोजीच्या आदेशान्वये उठवून पूर्वीच्या दिनांक १४ एप्रिल, १९८१ च्या निर्णयानुसार कार्यपध्दती सुरु ठेवण्याचे निर्देशित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याअनुषंगाने शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या संघटनेने अनुक्रमे दि.११/०१/२०१२, ११/०५/२०२१, ०९/०१/२०२२ व ०२/०३/२०२२ रोजी निवेदने देवून चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या वारसास सेवानिवृत्तीनंतर विशेष बाब म्हणून अनुकंपा तत्वावर नोकरीत सामावून घ्यावे अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी शासनाने चौकशी करुन वारसांना विशेष बाब म्हणून अनुकंपा तत्वावर नोकरीत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. एकनाथ शिंदे (११-११-२०२२) : (१) नाही
(२) व (३) चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या वारसास अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत नियुक्ती देण्याचे राज्य शासनाचे कोणतेही धोरण नाही.

दि.१४.०४.१९८१ व दि.१०.१२.१९८१ च्या शासन परिपत्रकाद्वारे राज्य शासनाच्या चतुर्थश्रेणीतील कर्मचाऱ्यांच्या मुलास/ अविवाहीत मुलीस शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी केवळ सेवायोजन कार्यालयाच्या शिफारशीची अट रद्द करण्यात आली होती. मात्र त्यांना निवडीद्वारे नियुक्तीच्या विहित कार्यपद्धतीपासून सूट देण्यात आली नव्हती.

मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारे, वरील शासन परिपत्रके, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दि.२२.०६.२०२१ अन्वये रद्द करण्यात आली असून शासकीय/ निमशासकीय कार्यालये, महामंडळे, सहकारी संस्था, स्वायत्त संस्था, सार्वजनिक उपक्रम इ. च्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांमधील रिक्त पदे भरताना पात्र उमेदवारांची विहित पध्दतीनुसार निवड करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महानगरपालिकेतील मुख्य सुरक्षा अधिकारी यांना बेकायदेशीर पुर्ननियुक्ती दिल्याबाबत

(४४) ४५७५१ (२८-०९-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगपालिकेतील मुख्य सुरक्षा अधिकारी हे दोन निवृतीवेतन घेत असूनही त्याची बेकायदेशीर पुन्हा-पुन्हा नियुक्ती केल्याने ठाणे महापालिकेतील सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करताना कोणतेही निकष न पाळता त्याच व्यक्तीला पुन्हा पदभार दिल्याने सुरक्षा रक्षकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तसेच सैन्य दलातून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांना वरील पदावर नियुक्ती न देता सतत वादग्रस्त ठरलेल्या व्यक्तीची पुन्हा-पुन्हा त्याच पदावर नियुक्ती केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी अधिकाऱ्याच्या विरोधात महिला, पुरुष अंगरक्षक व सुरक्षा रक्षकांच्या विविध तक्रारी केल्या असून त्यांची या पदावर नियुक्ती करू नये अशी लेखी तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-११-२०२२) : (१), २), (३) व (४) ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार मुख्य सुरक्षा अधिकारी या पदावर श्री.मच्छिंद्र भिमा थोरवे यांची नियुक्ती दिनांक २३.०१.२०१९ रोजी तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्याकरिता व तद्नंतर दिनांक ०६.०५.२०२१ रोजी करण्यात आली होती. तसेच उपरोक्त दोन्ही आदेशांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे.

ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार सदरची नियुक्ती ही जाहिरातीद्वारे ऑनलाईन अर्ज मागवुन तद्नंतर निवड समितीच्या शिफारशीनुसार करण्यात आली आहे. उपरोक्त मुख्य सुरक्षा अधिकारी यांची मुदत दिनांक २३.०८.२०२२ रोजी संपुष्टात आली असून ते सद्या कार्यरत नाहीत.

दरम्यान संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द ठाणे महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागातील कर्मचाऱ्यांच्या तसेच ठाणे शहरातील लोकप्रतिनिधींच्या तक्रारी महानगरपालिका स्तरावर प्राप्त झाल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, प्राप्त झालेल्या तक्रारींचे स्वरुप विचारात घेता, आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना सदर प्रकरणी आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्हयातील सातही आगारातील अनेक बसेस कालबाहय झाल्याबाबत

(४५) ४५९१६ (१६-०९-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील सातही आगारातील कालबाहय बस गाडयांचे प्रमाण अधिक असून मेहकर आगारातील ७६ बसगाडयांपैकी १९ बसेसचे आयुर्मान संपले असतांनाही या बसेसचा वापर होत असल्याचे माहे मे, २०२२ रोजी मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नादुरुस्त बसेसमुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०९-११-२०२२) : (१) व (२) दि.२७.०५.२०२२ च्या वर्तमानपत्रामध्ये अशा आशयाचे वृत्त प्रसिद्ध झाले होते,परंतू वस्तूस्थिती तशी नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महानगरपालिकेकडे अनेक प्रकल्प प्रलंबित असतांनाही सल्लागारांची नेमणूक करुन कोट्यावधी रुपये खर्च केल्याबाबत

(४६) ४५९८४ (२५-०९-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेकडे अनेक प्रकल्प प्रलंबित असतांना तसेच निधी उपलब्ध नसतांनाही विविध प्रकल्पांवर सल्लागाराची नेमणूक करुन त्यांच्या वेतनावर कोट्यावधी रुपये खर्च करीत असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सातत्याने सल्लागार नेमण्याच्या पालिकेच्या भूमिकेमुळे महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांवर विश्वास नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यंत स्मार्ट सिटी, सॅटीस, उड्डाणपूल, एकात्मिक नाले बांधणी मलवाहिनी प्रकल्प, ट्रामरेल्वे रिंग रूट प्रकल्प, खाऱ्या पाण्याचे गोड्या पाण्यात रुपांतर आदी प्रकल्पात सल्लागार नेमणूक करून कोट्यावधी रुपये खर्च करून प्रकल्प पूर्ण करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी अनेक प्रकल्प प्रलंबित असतांनाही सल्लागारांची नेमणूक करुन कोट्यावधी रक्कमेचा खर्च करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(५) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-११-२०२२) : (१), (२), (३), (४) व (५) स्थानिक वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी आली होती, ही वस्तुस्थिती आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात विविध विकास प्रकल्पांची अमंलबजावणी करण्यात येत आहे. सदर प्रकल्प राबविताना विशेष तांत्रिक ज्ञानाची आवश्यकता असल्यास अशा प्रकल्पावर त्या क्षेत्रातील तांत्रिक/तज्ञ सल्लागारांची नेमणूक महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत ठाणे स्मार्ट सिटी अंतर्गत नवीन उपनगरीय रेल्वे स्थानक, सॅटीस मल्टी मोडल ट्रान्झीट हब, गावदेवी मैदान भुमिगत पार्कींग प्रकल्प, वॉटर फ्रंट डेव्हलपमेंट प्रोजेक्ट तसेच भुमिगत योजना टप्पा क्र. ४, एकात्मिक नाले बांधणी प्रकल्प, ठाणे ते कळवा खाडीवरील पूल, दिवा स्टेशन जवळील उड्डाण पुल, भुमिगत योजना टप्पा क्र. ४, वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्प इत्यादी महत्वपुर्ण पायाभूत सोयीसुविधांच्या योजना राबविण्यात येत आहेत. सदर प्रकल्पांकरीता आवश्यकतेनुसार तांत्रिक सल्लागारांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

उपरोक्तपैकी काही प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याची कार्यवाही सुरु असून बरेच प्रकल्प प्रगतीपथावर असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

मुंबई शहर आणि उपनगरातील अस्तित्वात असलेल्या भूजलांची तसेच विहिरींची नोद होण्याबाबत

(४७) ४६००० (२७-०९-२०२२). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर आणि उपनगरात २९ हजारांपेक्षा जास्त पाण्याच्या विहिरी अस्तित्वात असताना त्यापैकी हजारो विहिरीवर अतिक्रमण सुरु झालेले असून विहिरीची पुरेशी नोंद तसेच भूजलाची नोंद नसल्याने मुंबईत ३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या पाण्याची सर्रासपणे लुट होत असतानाही आजमितीस महापालिका प्रशासनाकडून पाणी वापराबाबत धोरण निर्धारित करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) तसेच मुंबई महानगरपालिकेच्या परवानगीविना मागील कांही वर्षात मुंबई शहरातील तब्बल साडेसात हजारांहून अधिक विहिरी बुजविण्यात आल्याचे दिनांक १५ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, जमिनी हडपण्यासाठी अनधिकृत बांधकामे सुरु असून विहीरींवरही अनधिकृत बांधकामे उभी करत त्या बुजविल्या जात असून त्या बुजविणाऱ्यांवर कठोर कारवाई होण्याच्या दृष्टीने तसेच मुंबईतील सर्व विहिरींची तसेच भूजलाची नोंद करुन बुजविण्यात आलेल्या विहिरी पुर्नजिवित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२२) : (१) व (२) अशा आशयाची कोणतीही माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही.

तथापि, मुंबईच्या विद्यमान भूजल संसाधनाच्या वापराची क्षमता लक्षात घेऊन वैज्ञानिकदृष्ट्या अभ्यास करुन पाणी वापराचे धोरण निर्धारित करण्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्याची विनंती पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास करण्यात आली आहे.

तसेच, मुंबई शहर व उपनगरात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा करण्यात येतो. मुंबई शहर व उपनगरात अस्तित्वात असलेल्या विहिरींमधील पाण्याचा वापर पिण्याव्यतिरिक्त कामांकरिता करण्यास परवानगी देण्यात येते, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) अनधिकृतपणे विहिरी बुजविण्याचा प्रकार निदर्शनास आल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३ अन्वये कारवाई करण्यात येते.

सद्य:स्थितीत बुजविण्यात आलेल्या ३९ विहिरींपैकी २७ विहिरींबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे व १२ विहिरींबाबत पुढील कार्यवाही करण्याकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास कळविण्यात आले आहे.

काही बुजविलेल्या विहिरींच्या जागेवर/भूखंडावर महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागाने परवानगी दिल्याचे व काही ठिकाणी विकासकांनी विहिर पुनर्स्थापित केल्याचे तसेच काही ठिकाणी त्याच भूभागावर विकासकाद्वारे पर्यायी विहिरीचे बांधकाम केल्याचे दिसून येते, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मानखुर्द चीता कॅम्प (मुंबई) परिसरातील दीनदयाळ उपाध्याय उद्यानाच्या डागडुजी व देखभालीमध्ये केलेला गैरव्यवहार

(४८) ४६०२१ (२७-०९-२०२२). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत असलेल्या मानखुर्द चीता कॅम्प परिसरातील दीनदयाळ उपाध्याय उद्यानाच्या डागडुजी व देखभालीसाठी सन २०१८-१९ व २०१९-२० या आर्थिक वर्षांत कोणतीही डागडुजी व देखभाल न करताही कंत्राटदाराने सादर केलेल्या देयकापोटी अधिकाऱ्यांनी संगनमत करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे तक्रार करुन १ वर्षे उलटूनही याप्रकरणी आजमितीस कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तक्रारींच्या अनुषंगाने सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांविरोधात कोणतीही कारवाई न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होऊन संबंधित दोषींविरोधात कायदेशीर कारवाई विनाविलंब होण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-११-२०२२) : (१), (२) व (३) अशा आशयाची तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाली आहे, हे खरे आहे.

कंत्राटदार मे. राजदिप इंटरप्रायजेस यांना देण्यात आलेल्या कार्यादेशानुसार मानखुर्द चीता कॅम्प परिसरातील दिनदयाळ उपाध्याय उद्यानात नामफलक, सूचना फलक लावणे, झाडे-झुडपे लावणे, कचरा कुंडी बसविणे, नागरिकांना बसण्याकरिता बाक बसविणे, प्रवेशद्वार बसविणे व २ वर्षे ६ महिने या कालावधीकरिता मैदानाची साफसफाई करणे, झाडे झुडपांची निगा राखणे, सुरक्षा व्यवस्था इत्यादी पार पाडलेल्या कामांसाठी कंत्राटदारास रु. ७१.४६ लाख इतक्या रकमेचे अधिदान करण्यात आले आहे.

तथापि सदर कामाच्या पाहणीदरम्यान वेळोवेळी आढळून आलेल्या त्रुटींसाठी सदर कंत्राटदारास रु. ४.२५ लाख इतका दंड आकारुन वसुल करण्यात आला आहे. तसेच सदर मैदानात परिरक्षण कामाच्या पाहणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटींनुसार कंत्राटदारास देय असलेल्या रकमेतून रु. १.३७ लाख इतकी रक्कम बचत केली असून, रु. ४० हजार इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

तसेच, माहे एप्रिल, २०२० ते सप्टेंबर, २०२० या वाढीव कालावधीसाठी कंत्राटदारास रु. १४ लाख इतक्या रकमेचा परिरक्षणासाठी कार्यादेश देण्यात आला होता. तथापि सदर कालावधीत कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे कंत्राटदाराने मैदानाचे परिरक्षणाचे काम योग्य प्रकारे न केल्याने त्यांना कोणतेही अधिदान करण्यात आलेले नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महानगरपालिकेतील बीएसयुपी योजनेची चौकशी होण्याबाबत

(४९) ४६०३२ (२५-०९-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात बीएसयुपी या योजने अंतर्गत १२५५० घरे उभारणी करीता ५६८ कोटीची मंजुरी केंद्र शासनाने दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार ठाणे महानगरपालिकेने आजपावेतो ६३४३ घरांची उभारणी करून या कामासाठी ८०० कोटी रुपये खर्च केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रेडीरेकनर दर गृहीत धरले तर प्रत्येक घरांसाठी ९ लाख खर्च अपेक्षित असताना ठाणे महापालिकेने प्रत्येक घरांसाठी १३ लाख खर्च केले म्हणजे ४ लाख अतिरिक्त खर्च केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू बीएसयुपी योजनेची चौकशी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-११-२०२२) : (१), (२), (३) व (४) ठाणे महानगरपालिकेत केंद्र पुरस्कृत बीएसयूपी योजनेची अंमलबजावणी सन २००७ पासून करण्यात येत आहे.

सदर योजनेअंतर्गत केंद्र, राज्य, महानगरपालिका व लाभार्थी यांचा हिस्सा ठरविण्यात आला आहे. सदर योजनेअंतर्गत महानगरपालिकेमार्फत केंद्र शासनाकडे सन २००५-०६, २००७-०८, २०१०-११ च्या दरसूचीवर आधारीत अनुक्रमे डि.पी.आर-१, २, ३ व ४ चे अंदाज खर्च पाठविण्यात आले होते. सदर योजेने अंतर्गत मुळत: डी.पी.आर-१, २, ३ व ४ यांच्या एकूण रुपये ५६८.८९ कोटीच्या प्रकल्प खर्चास मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. तथापि, सदर प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी दरम्यान झोपडपट्टीधारकांकडून होणारा विरोध, न्यायालयीन दावे, प्रकल्प भूखंडावरील अडचणी, केलेला जागा बदल, डी.एस.आर दरांमधील तफावत, त्यातील भाववाढ इ. कारणांमुळे सदर प्रकल्पांअंतर्गत बांधण्यात आलेल्या ६३४३ सदनिकांवर आजतागायत रुपये ८१७.४३ कोटी खर्च झाल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे. डीपीआर निहाय प्रती सदनिका खर्च वेगवेगळा आहे.

तसेच त्याचप्रमाणे एकूण ४ टप्प्यातील प्रकल्पांतर्गत प्रति सदनिका सरासरी रुपये १२.८८ लक्ष खर्च झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

सदर योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीकरिता महानगरपालिकेच्या हिस्स्यापोटी रुपये ६२१.३१ कोटी एवढा खर्च झाला आहे. सदर खर्चापैकी १६३.४८ कोटी इतका खर्च प्रकल्पाच्या पायाभूत सुविधांसाठी करण्यात आला आहे.

बीएसयुपी प्रकल्पातील सदनिकांच्या दर्जाच्या अनुषंगाने वेळोवेळी नोडल एंजन्सीमार्फत त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षणाद्वारे तांत्रिक चाचण्या करण्यात आल्या असून केंद्रशासनाच्या व राज्य शासनाच्या संबंधित प्रतिनिधींकडून वेळोवेळी पाहणी झाल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे. सदर इमारतीच्या बांधकामाचा दोष-दायित्व कालावधी संपला असून संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्याची आवश्यकता नसून लाभार्थींना सदनिका मालकी तत्वावर देण्यात आल्यामुळे त्या-त्या इमारतीच्या रहिवाशांच्या सोसायटीमार्फत इमारतींची देखभाल करणे आवश्यक असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील मुलुंड विभागातील डोंगरमाथ्या वरील वस्तींना कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याबाबत

(५०) ४६७३४ (२२-०७-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मुलुंड टी विभागात अमर नगर, शंकर टेकडी, राहुल नगर, हनुमानपाडा या वसाहती डोंगरमाथ्या असल्याने तेथे कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याचा तक्रारी लोकप्रतिनिधींनी दिनांक २० मे, २०२२ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी या वसाहती मध्ये अतिरिक्त जलवाहिनी जोडणी देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय,
(३) तसेच पाणी पुरवठा करण्याकरिता सध्या विद्युत पंपाची गरज असून, विद्युत प्रवाह खंडीत झाल्यास नागरिकांना पाणी पुरवठा सुरळीत होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार खिंडीपाडा येथील पाण्याच्या डक्ट मधून वसाहतीच्या वरील बाजूने नवीन जलजोडणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०४-११-२०२२) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर ठिकाणी सद्य:स्थितीत उंचावरील डोंगराळ भागाच्या पाणी पुरवठ्यासाठी स्थानिक रहिवाशी मंडळांमार्फत भूमिगत शोषण टाकी व उदंचन व्यवस्था चालविण्यात येत असून, विद्युत पुरवठा खंडीत न होण्याची जबाबदारी सदर मंडळांनी घेणे अपेक्षित आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदर ठिकाणी पाण्याची डक्टलाईन फार जुनी व जीर्ण झाल्याने बऱ्याच वर्षांपासून वापरात नाही. त्यामुळे पाण्याच्या सदर डक्टलाईनमधून वसाहतीच्या वरील बाजूने नवीन जलवाहिनी टाकणे शक्य नाही. याकरिता सदर वसाहतीमध्ये अतिरिक्त जलवाहिनी देण्याबाबतचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे.

सदर योजना टप्प्याटप्प्यात अंमलात आणण्यासाठी / जलवाहिनी टाकण्यासाठी कार्यवाही सुरु आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.